

महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ४, अंक ४ ऑक्टोबर २०२३ (क्र.१५)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३
उपऱ्या प्रजातींचे मूक आव्हान

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

कान्हरगाव वन्यजीव अभयारण्य ४
राज्य शासनाकडून ८००० हेक्टर जंगल लाकूडतोडीसाठी FDCM कडे हस्तांतरित

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ४
ताडोबा अंधारी प्रकल्पातील मुधोली नियतक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी महिलेचा मृत्यू
ताडोबा अंधारीतील पर्यटनाचे ऑनलाईन बुकींग करणाऱ्या कंपनीकडून अफरातफर

तिलारी संवर्धन राखीव ५
चार वर्षांपूर्वी नव्याने नोंद झालेली खेकड्याची प्रजाती यंदा तिलारीच्या जंगलात आढळली

पेंच व्याघ्र प्रकल्प ५
पेंच प्रकल्पातील वाघांवर लक्ष ठेवण्यासाठी ॲप
बचाव मोहिमा व गस्तीसाठी कर्नाटकातून पेंच व्याघ्र प्रकल्पात आणणार चार हत्ती

भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य ६
भीमाशंकर अभयारण्यालगत कुसूरच्या पठारावर जागतिक पर्यटन केंद्राचे नियोजन

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ७
आरे वसाहतीतील नैसर्गिक तलावांत गणपती विसर्जनास मनाई कायम – उच्च न्यायालय

**प्रादेशिक बातम्या**

राज्यव्यापी ८
महाराष्ट्रात ४४४ वाघ; पैकी २९१ वाघ व्याघ्र प्रकल्पांमध्ये तर प्रादेशिक वनांत १५३ वाघ
वन्य प्राण्यांकडून झालेल्या नुकसानाची भरपाई विलंबाने दिल्यास व्याजासकट; विधेयक मंजूर
जुन्नर इथे बिबट्या सफारीसाठी शासनाकडून ८० कोटींची तरतूद – वन मंत्री
समृद्धी महामार्गावर १० महिन्यांत ५० पेक्षा जास्त वन्य प्राण्यांचे अपघाती मृत्यू
लांडग्यांच्या संवर्धनासाठी वन विभागाचा राज्यस्तरीय आराखडा मंजुरीसाठी केंद्राकडे

कोकण १०
ऑलिव रिडले कासवांच्या उपग्रहाधारित अंकन संनियंत्रणाचा प्रकल्प – घटनाक्रम

पश्चिम महाराष्ट्र १३
जेजुरीजवळ पिंगोरी गावात गिधाड संवर्धन केंद्र

माणूस-बिबट्या १३
पुणे जिल्ह्यात या वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत ४६ बिबट्यांचा मृत्यू
गोंदिया जिल्ह्यात वीजवाहक तारांचा वापर करून तीन बिबट्यांची शिकार; चौघांनी दिली कबुली
संघर्षविषयक घटनांचे संक्षिप्त वृत्त १४

**आंतरराज्यीय बातम्या**

महाराष्ट्र/छत्तीसगढ १५
चंद्रपुरातून पकडलेल्या वाघिणीला छत्तीसगढमधील व्याघ्र प्रकल्पात पाठवणार

**राष्ट्रीय बातम्या**

‘स्टेट ऑफ इंडियाज् बर्ड्स 2023’ अहवाल १५

वर्ष २०२२ च्या गणनेनुसार भारतात ३,६८२ वाघ १७
पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये माणूस वन्यजीव संघर्षावर उपाययोजनेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर १८
गंगा नदीतील विविध प्रजातींच्या कासवांची तस्करी करणाऱ्या सहा जणांना अटक १९
भारतात हत्तींचे किमान १५० भ्रमणमार्ग; 'प्रोजेक्ट एलिफंट' अंतर्गत अभ्यासातील निरीक्षण १९
देशात उपऱ्या वनस्पतींच्या आक्रमणाचे प्रमाण चिंताजनक असल्याचा अभ्यासाचा निष्कर्ष २०

**आंतरराष्ट्रीय बातम्या**
जगभरात उपऱ्या प्रजातींचे आक्रमण अभूतपूर्व वेगाने वाढत असल्याचा अभ्यासाचा निष्कर्ष २१

**विशेष लेख** २२
दोडामार्ग वन परिक्षेत्रातील खवलेमांजर वाचवा मोहीम

**थोडक्यात पण महत्त्वाचे** २४
मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची ५० वर्षे आणि बेकायदा पुनर्वसन

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड ४, अंक ४, ऑक्टोबर २०२३ (क्र. १५)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ता:**C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेल:**marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळ:**https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/

***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**Duleep Matthai Nature Conservation Trust**

C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/

**Paul Hamlyn Foundation**

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***



## संपादकीय

### उपऱ्या प्रजातींचे मूक आव्हान

वन्य अधिवासातील साधनसंपत्तीचा अनिर्बंध, बेकायदा वापर, वन्यजीवांची तस्करी, शिकार, संरक्षित क्षेत्रातील जमिनीचा वनेतर कारणांसाठी वापर इत्यादी वन्यजीव संरक्षण, संवर्धनाच्या आड येणारी विविध आव्हाने, समस्या बहुतेक सर्वांना ठाऊक असतात. काही अप्रत्यक्ष आव्हानांची मात्र आपल्याला सुतरामही कल्पना नसते. ‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या प्रस्तुत अंकात अशा एका समस्येचा समावेश करण्याची संधी मिळाली.

आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर परक्या (alien) आक्रमक (invasive) वनस्पतींच्या व्याप्तीचे अभ्यास अहवाल योगायोगाने लागोपाठ प्रकाशित झाले. या बातम्यांनी सजीवांच्या उपऱ्या किंवा परकीय प्रजातींच्या वन्य अधिवासातील आक्रमणाची समस्या अधोरेखित केली आहे. उपऱ्या प्रजातींच्या आक्रमणाची समस्या वार्तापत्राच्या वाचकांसमोर सविस्तर मांडण्याच्या हेतुने या दोन्ही बातम्यांचा अंकात समावेश करण्याचा निर्णय घेतला.

स्थानिक प्रदेशात उत्क्रांत झालेल्या वनस्पती किंवा प्राण्यांच्या प्रजाती या त्या त्या प्रदेशातील जैविक, अजैविक घटकांशी जुळवून घेत उत्क्रांत झालेल्या असतात. या उलट बाहेरून एखाद्या प्रदेशात आलेल्या प्रजाती त्या प्रदेशातील परिसंस्था, अधिवास आणि त्यातील अन्नसाखळयांमध्ये उपऱ्या किंवा परकीय ठरतात. अशा अनेक प्रजाती जगभरात पसरलेल्या आहेत.

या प्रसाराला प्रामुख्याने मानवी हस्तक्षेप कारणीभूत आहे. हस्तक्षेपाची कारणे वेगवेगळी आहेत, प्रजातींचा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात झालेला प्रवास माणसाच्या कळतनकळत झालेला आहे. परंतु, जसजसे जग जवळ आले तसतशी परक्या प्रजातींच्या आक्रमणाच्या समस्येची व्याप्ती व गांभीर्य वाढत गेले आहे.

उपऱ्या प्रजातींमुळे एखाद्या ठिकाणची स्थानिक जैवविविधता नाहीशी होते, स्थानिक भक्ष्य, भक्षक नाहीसे झाल्यामुळे अन्नसाखळ्या मोडतात, अधिवासाचा ऱ्हास होतो. साहजिकच त्या अधिवासातील वन्यजीवन कोलमडते. सर्व प्रकारच्या परिसंस्था, अधिवासांमध्ये हा ऱ्हास कमीजास्त वेगाने मात्र सातत्याने होत आहे. म्हणून या समस्येला मूक आव्हान असे म्हटले आहे.

या दुष्परिणामांना सर्वाधिक कारणीभूत ठरलेली वनस्पती म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवरील अभ्यासांमध्ये *लँटाना कमारा* हिचे नाव समोर आले आहे. हा निश्चितच योगायोग नाही.

लँटाना ही वनस्पती आपणा सर्वांच्या किमान पाहण्यात आलेली असावी. शास्त्रीय नावावरून बोध होईलच असे नव्हे म्हणून – मराठी भाषेत ही वनस्पती घाणेरी किंवा टणटणी म्हणून ओळखली जाते. वास्तविक, पर्यावरणशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ यांची एक विचारधारा सांगते की उपऱ्या प्रजातींना स्थानिक नावे देऊ नयेत. तसे केल्यास त्या स्थानिकच असल्याचा आभास निर्माण होतो व जनमानसात गैरसमज रूजतो. असे गैरसमज एकदा पसरले की दूर करणे अवघड होते.

दक्षिण अमेरिकेतील स्थानिक असलेल्या लँटानाचा जगात इतरत्र प्रसार १६९० च्या सुमारास सुरू झाला. आजघडीला अंटार्क्टिका वगळता सर्व खंडांमध्ये तिने मूळ रोवले आहे. तिच्या रंगीबेरंगी फुलांना असलेल्या सौंदर्यमूल्यासाठी साधारण १८०७ पासून पुढे ब्रिटिशांनी लँटाना भारतात आणल्याची नोंद एका अभ्यासात आहे.

भारतात वाघांच्या अधिवासात म्हणजे जवळपास सर्वच राज्यांमध्ये लँटानाचा प्रसार झाला आहे. त्यामुळे हे अधिवास धोक्यात आले आहेत. लँटानाच्या आक्रमणात तृणभक्षी प्राण्यांच्या खाद्याची विविधता आणि उपलब्धता कमी झाली आहे. तृणभक्षी प्राण्यांची संख्या घटल्यास त्यांच्या भक्षक प्राण्यांना - ज्यामध्ये वाघाचाही समावेश आहे – पुरेसे खाद्य उपलब्ध होणार नाही. परिणामी, त्यांचीही संख्या कमी होणार.

या बाबींकडे लक्ष वेधणारे शोधनिबंध, अभ्यास अहवाल अलिकडच्या काही वर्षांत सातत्याने प्रकाशित केले जात आहेत, प्रसारमाध्यमे त्यांची दखल घेऊ लागली आहेत, ही दिलासादायक बाब आहे. परंतु, इथे नमूद केले पाहिजे की या दोन्ही बातम्या इंग्रजी प्रसारमाध्यमांमधून घेतल्या आहेत. मराठी माध्यमांमध्ये त्या सहजासहजी तरी पाहण्यात आल्या नाहीत. परंतु, येत्या काळात मराठी माध्यमेही या आणि अशा मूक समस्यांची दखल घेतील, अशी अपेक्षा ठेवणे, इतकेच सध्या आपल्या हातात आहे.

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### कान्हरगाव वन्यजीव अभयारण्य

**राज्य शासनाकडून ८००० हेक्टर जंगल लाकूडतोडीसाठी FDCM कडे हस्तांतरित**



महाराष्ट्र शासनाने अलिकडेच ७९.२० चौ. किमी (जवळपास ८,००० हेक्टर) क्षेत्रावर पसरलेल्या उत्तम जंगलाचा ताबा राज्याचे वन विकास महामंडळ अर्थात फॉरेस्ट डेवलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (FDCM) ला व्यावसायिक लाकूड पुरवठ्यासाठी भाडेतत्त्वावर दिला. कान्हरगाव वन्यजीव अभयारण्यासाठी FDCM ने दिलेल्या जमिनीच्या बदल्यात हे क्षेत्र शासनाने दिले आहे.

गेल्या १०-१२ वर्षांत राज्य शासनाने FDCM कडील ७५० चौ. किमी क्षेत्र वेगवेगळी संरक्षित क्षेत्र अधिसूचित करण्यासाठी घेतले. सोलापुरातील माळढोकासाठी असलेल्या ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्याच्या क्षेत्रात कपात केली त्या बदल्यात शासनाने FDCM कडून क्षेत्र घेतले. ताडोबा आणि कवल या दोन व्याघ्र प्रकल्पांना जोडणारा भ्रमणमार्ग संरक्षित करता येईल अशा भागात कान्हरगाव अभयारण्य अधिसूचित करण्यासाठी FDCM कडून शासनाने १५ मार्च २०२१ रोजी २५१.३८ चौ. किमी क्षेत्र घेतले. त्या बदल्यात FDCM शासनाकडे २२०.३० चौ. किमी वन क्षेत्राची मागणी करत आहे. ही मागणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ७९.२० चौ. किमी क्षेत्र FDCM कडे हस्तांतरित केल्याचे प्रस्तुत वृत्तात नमूद केले आहे.

हस्तांतरित केलेल्या क्षेत्राच्या व्यवस्थापन आराखड्याला केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाकडून मंजुरी मिळत नाही तोपर्यंत या क्षेत्रात क्षेत्रीय वन विभागांच्या कृती आराखड्यांनुसार कार्यवाही सुरू करण्यास FDCM ला शासनाने सांगितले आहे.

मात्र, या निर्णयाला वन्यजीवप्रेमी आणि संवर्धकांनी विरोध दर्शवला आहे. नव्याने घोषित करण्यात आलेल्या अभयारण्याच्या क्षेत्रातच या वनाचा समावेश केला जावा, अशी त्यांची मागणी आहे. महसुली उत्पन्नासाठी सागाची एकपिकी लागवड करण्याची FDCM ची पद्धत कालबाह्य झाली आहे. त्याऐवजी, सांस्कृतिक वारसा असलेल्या घनदाट मिश्र जंगलांना जैवविविधता राखून ठेवण्यासाठी व पर्यावरणशास्त्रीय संतुलनाच्या दृष्टीने अधिक महत्त्व आले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

**स्रोत -** विजय पिंजरकर. ‘Amid climate change, state hands over 8k ha forest area to FDCM to cut’, *timesofindia.indiatimes.com*, ०५.०८.२०२३.

### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

**ताडोबा अंधारी प्रकल्पातील मुधोली नियतक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी महिलेचा मृत्यू**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मोहर्ली वनपरिक्षेत्रातील मुधोली नियतक्षेत्रात भद्रावती तालुक्यातील टेकाडी इथे २५ ऑगस्ट रोजी शेतात काम करत असताना ६० वर्षीय महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला.

या घटनेनंतर परिसरात गस्त वाढवण्यात आली असून २० स्वयंचलित कॅमेरे बसवले आहेत. वन्य प्राण्यांबाबत सावधगिरी बाळगण्याच्या सूचना रेकॉर्ड करून ध्वनिक्षेपकाद्वारे त्या वाजवण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना डोक्याच्या मागे लावता येतील असे मानवी चेहरे छापलेल्या मुखवट्यांचे वितरण प्रशासनाने केले आहे. असा मुखवटा शेतात काम करताना डोक्याच्या मागे लावलेला असला तर प्राण्यांना माणसाची पाठ असल्याचे लक्षात येणार नाही व त्यातून त्यांचे हल्ले टाळता येतील, अशी अपेक्षा आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात माणूस-वाघ संघर्षाच्या घटना टाळण्यासाठी ताडोबा प्रशासनाने विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे २५ सदस्यीय पथक तैनात केले आहे.

माणूस वन्यप्राणी संघर्षाचे प्रसंग टाळण्यासाठी ‘नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी’ (NTCA) च्या

मार्गदर्शक सूचनांनुसार समिती स्थापन केली आहे. या समितीने सुचवलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू आहे. मोहर्लीच्या वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.



**स्रोत** – ‘वन्य जीवांचे शेतकऱ्यांवरील हल्ले रोखण्यासाठी ताडोबा प्रशासन सज्ज; शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी अनोखी शक्कल,’ *maharashtratimes.com*, ३०.०८.२०२३.

### ताडोबा अंधारीतील पर्यटनाचे ऑनलाईन बुकींग करणाऱ्या कंपनीकडून अफरातफर

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनासाठी ऑनलाईन बुकींग घेण्याचे कंत्राट दिलेल्या ‘चंद्रपूर वाईल्ड कनेक्टिविटी सोल्युशन’ या कंपनीने १२ कोटी रुपयांची अफरातफर केल्याची तक्रार विभागीय वनाधिकाऱ्यांनी नोंदवली आहे.

चंद्रपुरात राहणाऱ्या अभिषेक आणि रोहीत ठाकूर या दोघा भावांची ही कंपनी आहे. या दोघांविरोधात भारतीय दंड विधानाच्या ४२० (फसवणूक) व ४०६ (गुन्हेगारी विश्वासघात) कलमांतर्गत रामनगर पोलीस ठाण्यात १८ ऑगस्ट रोजी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रपूर वाईल्ड कनेक्टिविटी सोल्युशनच्या २०२०-२१ ते २०२३-२३ या आर्थिक वर्षांच्या हिशेबतपासणीत पैशांचा गैरव्यवहार केल्याचे उघड झाले. कंपनीने ताडोबा अंधारीतील पर्यटनाच्या बुकींगमार्फत मिळालेले २२.८ कोटी रुपये प्रकल्प व्यवस्थापनाला देणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र कंपनीने १०.६५ कोटी रुपये व्यवस्थापनाला दिले.

उर्वरित सुमारे १२ कोटी रुपयांबाबत कंपनीकडे विचारणा केली असता मालकांना त्याविषयी स्पष्टीकरण देता आले नाही.

ताडोबा अंधारी व्यवस्थापनाने या कंपनीचे कंत्राट रद्द केले असून ऑनलाईन बुकींगसाठी अन्य कंपनीची नेमणूक केली आहे.

**स्रोत** - ‘Rs.12 crore fraud in online booking at tiger reserve unearthed, case filed,’ *www.ndtv.com*, १९.०८.२०२३.

## तिलारी संवर्धन राखीव

### चार वर्षांपूर्वी नव्याने नोंद झालेली खेकड्याची प्रजाती यंदा तिलारीच्या जंगलात आढळली

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात असलेल्या तिलारी राखीव संवर्धन क्षेत्रात ‘घाटियाना बोट्टी’ नामक गुलाबी रंगाचा खेकडा असल्याची नोंद प्रथमच झाली आहे. यंदा तिलारीत पहिल्यांदा दिसून आलेली ही प्रजाती वर्ष २०१८ मध्ये ‘जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया’चे डॉ. एस. के. पटी व वन्यजीव अभ्यासक तेजस ठाकरे यांना सह्याद्रीच्या डोंगररांगेतच मात्र इतरत्र आढळली होती. तेव्हा तिची नवी प्रजाती म्हणून नोंद करण्यात आली.

सह्याद्रीच्या कडेकपारीतील दगडांच्या खाचांमध्ये, झाडांच्या बुंध्याखाली हा खेकडा सापडतो. नदी व ओहळामध्ये आढळणाऱ्या खेकड्यांपेक्षा खाचांमध्ये, बुंध्याजवळ आढळणारे खेकडे लहान आणि विविध रंगाचे असतात. सह्याद्रीच्या रांगेत अशा प्रकारच्या जवळपास ११ प्रजातींची नोंद २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या शोधनिबंधात करण्यात आली आहे. अशा आणखीही प्रजाती असू शकतात, असा अभ्यासकांचा अंदाज आहे.

**स्रोत** – ‘तिलारीच्या जंगलात आढळला आकर्षक गुलाबी रंगाचा खेकडा, तेजस ठाकरे यांचा शोध,’ *maharashtratimes.com*, ०१.०८.२०२३.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### पेंच प्रकल्पातील वाघांवर लक्ष ठेवण्यासाठी ॲप

पेंच व्याघ्र प्रकल्पात वाघांची वागणूक आणि हालचालींविषयीच्या नोंदी ‘टायगर मॉनिटरींग रजिस्टर’ अर्थात नोंदवहीत हाती लिहिल्या जात. आता मात्र,

त्याकरता टायगर मॉनिटरींग ॲप विकसित करण्यात आले असून त्याचा वापर लवकरच सुरू होईल.

या प्रणालीमुळे वाघ नेमका कुठून आला, त्याचा भ्रमणमार्ग, त्याच्या वागणुकीसह इतर माहितीची नोंद करणे शक्य होणार आहे. राज्यातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने पत्रकारांसाठी पेंच व्याघ्र प्रकल्पात अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. त्या दरम्यान, पेंच प्रकल्पाचे उपसंचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ला यांनी ही माहिती दिली.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील ४४ वाघांवर या प्रणालीद्वारे लक्ष ठेवण्यात येणार आहे. वन विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना त्यासाठी प्रशिक्षण दिल्यानंतर ॲपच्या वापराला सुरुवात होईल. जानेवारी २०२२ पासून प्रकल्पातील ७४ कक्षांमध्ये 'टायगर मॉनिटरींग रजिस्टर' ठेवण्यात आले आहे.

**स्रोत** - 'वाघाचा मागोवा घेणार 'ॲप', पेंच प्रकल्पाने विकसित केले 'टायगर मॉनिटरिंग ॲप',' *www.esakal.com*, ०५.१०.२०२३.


### बचाव मोहिमा व गस्तीसाठी कर्नाटकातून पेंच व्याघ्र प्रकल्पात आणणार चार हत्ती

पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये कर्नाटकातून चार हत्ती आणण्याचे ठरले असून पैकी तीन हत्तींची निवड झाली आहे. कर्नाटकातील दुबरे आणि मोठीगोंडू इथल्या हत्ती छावण्यांना भेट देऊन हत्तींचे वर्तन, आरोग्याची स्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्रातील वनाधिकाऱ्यांनी ही निवड केली.

या छावण्यांमध्ये मादी हत्ती नसल्यामुळे इतर ठिकाणांहून एका मादी हत्तीची निवड लवकरच करण्यात येईल, अशी माहिती पेंच व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ला यांनी दिली.

साधारण सप्टेंबर अखेरीस हे हत्ती कर्नाटकातून पेंचमध्ये येतील. तत्पूर्वी पेंच व्याघ्र प्रकल्पातील मानसिंगदेव वन्यजीव अभयारण्याच्या चोरबाहुली वनपरिक्षेत्रात बोरबन इथे हत्तींसाठी छावणी उभारण्यात येणार आहे. बोरबन वनक्षेत्र हत्तींच्या छावणीसाठी उत्तम स्थान आहे. नवेगाव-खैरी धरणाच्या जलाशयात प्रवेश करण्याचा मार्ग, नैसर्गिक अधिवास, मानवी हस्तक्षेपापासून दूर आणि संरक्षणासाठी एक सुरक्षा झोपडी आदी सुविधा इथे आहेत, असे वृत्तात नमूद केले आहे. मात्र, या बाबींच्या अंमलबजावणीबाबतचे वृत्त उपलब्ध झाले नाही.

माणूस वन्यजीव संघर्षावर नियंत्रण आणणे, वाघांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, बचाव मोहिमांमध्ये व गस्त घालण्यासाठी या हत्तींचा वापर करण्यात येणार आहे. या मोहिमेचे नेतृत्व मुंबईतील पश्चिम विभागाचे अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक क्लेमेंट बेन यांच्याकडे आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील पथकात डॉ. शुक्ला, पशुवैद्य डॉ. सुजित कोलंगट, चोरबाहुली वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे आणि इतर सहाय्यक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.



**स्रोत** – 'पेंच प्रकल्पात येणार कर्नाटकातून हत्ती,' *www.esakal.com*, २९.०८.२०२३.

## भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य

### भीमाशंकर अभयारण्यालगत कुसूरच्या पठारावर जागतिक पर्यटन केंद्राचे नियोजन

मावळातील कुसवली अर्थात कुसूर पठाराचा समावेश जागतिक पर्यटन केंद्र बनवण्यासाठी जिल्हा आराखड्यात करावा, असे निर्देश महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सप्टेंबर महिन्यात मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत दिले. सुमारे १,२०० एकर क्षेत्रावर पसरलेले कुसूरचे पठार भीमाशंकर अभयारण्याला लागून आहे.

मावळ तालुक्यातील कुसूरचे पठार पनवेल आणि मुंबईपासून कमी अंतरावर आहे. त्यामुळे या परिसरात पर्यटन विकासाला चांगला वाव आहे. इथे जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र तयार करण्यासाठी जिल्हा विकास आराखड्यात त्याचा समावेश करावा. पर्यटन विकासासाठी शासन निधी उपलब्ध करून देईल. दरम्यान, आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक माहितीचे संकलन करावे, लवकरच याबाबत

पुण्यात बैठक घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, पर्यटन संचालक डॉ. बी.एन. पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक ज्ञानेश्वर दाभाडे उपस्थित होते.

**स्रोत** – 'मावळातील कुसवली होणार जागतिक पर्यटन केंद्र, पुणेकरांना अनुभवता येणार निसर्गसौंदर्याचा ठेवा,' *maharashtratimes.com*, २२.०९.२०२३.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### आरे वसाहतीतील नैसर्गिक तलावांत गणपती विसर्जनास मनाई कायम – उच्च न्यायालय



कोणाच्या धार्मिक भावना दुखवायच्या नाहीत, परंतु पर्यावरणाचे संरक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने २५ सप्टेंबर रोजी नोंदवले आणि आरे दुग्ध वसाहतीत गणेश विसर्जनासाठी पुरेसे कृत्रिम तलाव आहेत की नाही? याचा आढावा संबंधित देखरेख समितीने घ्यावा, असे आदेश जारी केले. मात्र, आरेतील नैसर्गिक तलावांमध्ये विसर्जनाला परवानगी देण्याबाबत तातडीचा दिलासा देण्यास नकार दिला.

आरे दुग्ध वसाहतीचा परिसर केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इकॉलॉजिकली सेन्सिटिव झोन - ESZ) म्हणून घोषित केला आहे. त्यामुळे या वसाहतीतील तलावात गणेशमूर्तींचे विसर्जन करता येणार नाही, असे पत्रक आरे दुग्ध वसाहतीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ऑगस्ट महिन्यात जारी केले. या निर्णयाला मुंबई उपनगर गणेशोत्सव समन्वय समितीसह भाजपाच्या लोकप्रतिनिधींनी विरोध केला; तर या आदेशाला सहा महिन्यांची अंतरिम स्थगिती द्यावी आणि यंदा या तलावांत मूर्ती विसर्जनाला परवानगी द्यावी, या मागण्यांसाठी विश्व हिंदू परिषदे-(विहिंप)-ने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. गणेशमूर्ती विसर्जनाला २० सप्टेंबरपासून सुरुवात होणार असल्याने त्याआधी याबाबत अंतरिम दिलासा देण्याची आवश्यकता आहे, असेही 'विहिंप'ने न्यायालयात सांगितले.

मात्र, पर्यावरणीय दुष्परिणामांचा मुद्दा उपस्थित करत 'वनशक्ती' या बिगरसरकारी संस्थेने, मुंबई महानगरपालिकेने आरेतील तलावांत विसर्जनास दिलेल्या परवानगीविरोधात याचिका दाखल केली आहे. आरे वसाहतीचा परिसर ESZ असूनही या तलावात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे विसर्जन केले जाते, या बाबीकडे संस्थेने लक्ष वेधले आहे. या याचिकेवर ४ सप्टेंबरपासून सुनावणी सुरू आहे, असे न्यायालयाने विहिंपला सांगितले तेव्हा त्याबाबत आपण अनभिज्ञ असल्याचा दावा विहिंपने केला. मात्र, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्यास नकार दिला. तसेच, हे प्रकरण मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाकडे असल्यामुळे याचिकाही त्याच खंडपीठासमोर सादर करण्याची सूचना केली. ही सुनावणी सप्टेंबर महिन्याच्या मध्यात झाली.

त्यानंतर, २५ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत गौरी-गणपतींचे विसर्जन आरेतील कृत्रिम तलावात नुकतेच झाले. त्यात काहीही अडचण आली नाही असे वनशक्ती संस्थेने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच, या वर्षी एका कृत्रिम तलावासह सात फिरत्या कृत्रिम तलावांची व्यवस्थाही करण्यात आल्याचे मुंबई महानगरपालिकेने न्यायालयात सांगितले. या बाबींची नोंद करुन घेत उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना कोणताही तातडीचा दिलासा देण्यास नकार दिला.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (CPCB) अधिसूचनेनुसार, मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ESZच्या निरीक्षणासाठी देखरेख समिती नेमलेली आहे. CPCB ची अधिसूचना काही वर्षांपासून अंमलात असतानाही या समितीने आरेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे गणपती विसर्जनास परवानगी मागत दिलेली कारणच पटत नसल्याचे न्यायालयाने म्हटले.

दरम्यान, गणपती विसर्जनाचे दिवस उलटून गेल्यानंतर या विषयी पुढील वृत्तांकन आढळून आले नाही.

**स्रोत** – अमेय राणे. ‘धार्मिक भावना दुखवायच्या नाहीत, मात्र पर्यावरण संवर्धनही महत्त्वाचं; आरे तलावात गणेश विसर्जनावर उच्च न्यायालयाचे निरीक्षण,’ *marathi.abplive.com,* २५.०९.२०२३.
‘‘आरे’तील तलावांत यंदाही विसर्जन अशक्य? परवानगी मागणाऱ्या विहिंपच्या याचिकेवर तातडीने सुनावणीस नकार,’ *www.loksatta.com,* १६.०९.२०२३.
‘गणेश मंडळांसाठी मोठी बातमी; आरेतील गणपती विसर्जन वादात, अधिकाऱ्यांकडून मनाईचे पत्रक जारी,’ *maharashtratimes.com*, १९.०८.२०२३.

## प्रादेशिक बातम्या

### राज्यव्यापी

**महाराष्ट्रात ४४४ वाघ; पैकी २९१ वाघ व्याघ्र प्रकल्पांमध्ये तर प्रादेशिक वनांत १५३ वाघ**



केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे यांनी अखिल भारतीय व्याघ्रगणना २०२२ चा विस्तृत अहवाल २९ जुलै रोजी प्रकाशित केला. त्यानुसार महाराष्ट्रात ४४४ वाघ आहेत.

राज्यातील सर्वाधिक ९७ वाघ ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात आहेत. त्या खालोखाल ५७ वाघ मेळघाट व्याघ्र प्रकल्पात आहेत. पेंच व्याघ्र प्रकल्पात ४८, नवेगाव नागझिरा प्रकल्पात ११ आणि बोर प्रकल्पात नऊ वाघ आहेत. हे व इतर मिळून महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये एकूण २९१ वाघ आहेत. उर्वरित १५३ वाघ हे प्रादेशिक वन क्षेत्रांमध्ये आहेत.

महाराष्ट्रातील वाघांची वर्ष-निहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे

| गणनेचे वर्ष | वाघांची संख्या |
|---|---|
| २००६ | १०३ |
| २०१० | १६८ |
| २०१४ | १९० |
| २०१८ | ३१२ |
| २०२२ | ४४४ |

यापूर्वी, ९ एप्रिल रोजी कर्नाटकातील म्हैसूर इथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात ३,१६७ वाघ असल्याचा प्राथमिक आकडा जाहीर केला होता (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक २*). कॅमेरा ट्रॅपमध्ये प्रत्यक्ष दिसून आलेल्या वाघांची ही संख्या होती. सविस्तर अहवालात दिलेली संख्या ही अप्रत्यक्ष माहितीचे विश्लेषण करून ठरवण्यात आली आहे.

मध्य भारतात वाघांची संख्या लक्षणीयरित्या वाढल्याचे या अहवालात म्हटले आहे. त्यामध्ये, महाराष्ट्राचा उल्लेख असला तरी ही वाढ केवळ विदर्भातच आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात एकाही वाघाची नोंद झालेली नाही. सह्याद्रीच्या प्रदेशात संवर्धनासाठी केंद्रीकृत प्रयत्नांची गरज अहवालात नमूद केली आहे.

**स्रोत** – ‘विदर्भच महाराष्ट्राचा ‘वाघ’; केंद्र सरकारकडून व्याघ्र गणनेचा अहवाल जाहीर, काय सांगते आकडेवारी?’ *maharashtratimes.com*, ३०.०७.२०२३.

**वन्य प्राण्यांकडून झालेल्या नुकसानाची भरपाई विलंबाने दिल्यास व्याजासकट; विधेयक मंजूर**

वन्य प्राण्यांकडून झालेल्या नुकसानाची भरपाई पीडिताला घटनेच्या नोंदीपासून ३० दिवसांत मिळाली नाही तर भरपाईच्या रकमेवर व्याज दिले जाईल आणि व्याजाची रक्कम संबंधित अधिकाऱ्याकडून वसूल केली जाईल, असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. हा निर्णय लागू करणाऱ्या विधेयकाला राज्याच्या विधीमंडळातील दोन्ही सभागृहात मंजुरी मिळाली आहे.

वन्य प्राण्यांमुळे मनुष्य व पाळीव प्राण्यांची प्राणहानी किंवा त्यांना गंभीर इजा होते, शेती, फळबागा व प्रसंगी घरांचे नुकसानही होते. सर्व प्रकारच्या हानीची

व्याख्या करून भरपाईच्या रकमेत वाढ करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे, असे राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधान परिषदेत सांगितले.

**स्रोत** - वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात झालेल्या नुकसानीच्या भरपाई वेळेत न दिल्यास संबंधितास दंड; पीडितास व्याज देणार, *https://mahasamvad.in/?p=102524*, २६.०७.२०२३.

## जुन्नर इथे बिबट्या सफारीसाठी शासनाकडून ८० कोटींची तरतूद – वन मंत्री

लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार जुन्नर इथे बिबट्या सफारी सुरू करणार असल्याचे सांगून या सफारीसाठी ८० कोटी रूपयांची तरतूद शासनाने केली आहे, अशी माहिती राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधान परिषदेत दिली.

विधीमंडळाच्या सभागृहात बोलताना वन मंत्री म्हणाले की विदर्भातील अतिरिक्त वाघांना इतरत्र पाठवण्यासाठी सह्याद्री रांगेतील परिसराचा विचार केला जात आहे. मात्र, या संदर्भात तिथल्या स्थानिक लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा केल्यावर निर्णय घेऊ, असे मुनगंटीवार म्हणाले. तसेच, वाघांच्या भ्रमणमार्गांसाठी नव्याने वनीकरण केलेली जमीन घेण्याचा प्रस्ताव असल्याचेही त्यांनी सांगितले.

**स्रोत** - वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात झालेल्या नुकसानीच्या भरपाई वेळेत न दिल्यास संबंधितास दंड; पीडितास व्याज देणार, *https://mahasamvad.in/?p=102524*, २६.०७.२०२३.

## समृद्धी महामार्गावर १० महिन्यांत ५० पेक्षा जास्त वन्य प्राण्यांचे अपघाती मृत्यू

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर इगतपुरी भागात एक ऑक्टोबर रोजी वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाला. या महामार्गावर गेल्या १० महिन्यांत ५० पेक्षा जास्त वन्य प्राणी अपघातांत ठार झाले आहेत.

हा महामार्ग ज्या भागांमधून जातो त्यातील वन्यजीवांचे वास्तव्य असलेल्या भागांमध्ये राज्य वन्यजीव मंडळा-(स्टेट बोर्ड फॉर वाइल्डलाईफ)-च्या तज्ञ समितीने वन्य प्राण्यांचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना सुचवल्या होत्या. त्यातील अनेक उपाययोजनांची पूर्तता न करताच सरकारने घाईने समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला केला.

तज्ञ समितीने सुचवलेल्या उपाययोजनांमध्ये सुरक्षा भिंतीवर तारेचे कुंपण बसवणे, सुरक्षा भिंतीच्या खालून जागा राहणार नाही अशी काळजी घ्यावी, महामार्गावर नागरिकांनाही ये-जा करण्यासाठी जागा सोडू नये, वन्य प्राण्यांना महामार्ग ओलांडण्यासाठी उभारलेल्या उड्डाणमार्गावरील झाडे जोपर्यंत पुरेशी मोठी होत नाहीत, तोपर्यंत महामार्गावरील वाहतूक सुरू करू नये आदींचा समावेश होता. मात्र, या सूचनांची अंमलबजावणी झाली नाही, असे तज्ञ समितीचे सदस्य किशोर रिठे यांनी सांगितले. या संदर्भात सप्टेंबर अखेरीस राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना पत्र पाठवले होते. त्यानंतर त्यांनी समृद्धी महामार्गाची प्रत्यक्षात पाहणी केली आणि अनेक त्रुटी असल्याला दुजोरा दिला, असेही रिठे म्हणाले.

एकीकडे समृद्धी महामार्गावर प्राण्यांचे अपघाती मृत्यू होत आहेत; तर दुसरीकडे या महामार्गावर होणाऱ्या अपघातांमध्ये मनुष्यहानीचे प्रमाणही लक्षणीय आहे. प्राण्यांचे अपघात टाळण्याबाबत नाही; तरी महामार्गावरील अपघातांमध्ये होणारी मनुष्यहानी टाळण्यासाठी समृद्धी महामार्गावरील वाहतूक तूर्तास थांबवावी, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर चार आठवड्यांत उत्तर देण्याचे खंडपीठाने सरकारला आदेश दिले होते. या संदर्भातील पुढचे वृत्त हाती आले नाही.

**स्रोत** - चिन्मय जगताप. 'समृध्दी महामार्गावर बिबट्याचा अपघाती मृत्यू; वन्यजीवप्रेमींची भिती खरी ठरली,' *www.esakal.com,* ०३.१०.२०२३.
संदीप कापडे. 'समृद्धी महामार्गावरील वाहतूक थांबवा, न्यायालयात याचिका दाखल; राज्य सरकारला नोटीस!' *www.esakal.com,* २४.०८.२०२३.



## लांडग्यांच्या संवर्धनासाठी वन विभागाचा राज्यस्तरीय आराखडा मंजुरीसाठी केंद्राकडे

महाराष्ट्र राज्य वन विभागाने लांडग्यांच्या संवर्धनासाठी राज्यस्तरीय आराखडा तयार करून मंजुरीसाठी केंद्रीय वन्यजीव मंडळ (नॅशनल बोर्ड फॉर वाइल्डलाइफ) कडे प्रस्ताव पाठवला आहे.

पहिल्या टप्प्यात राज्यातील दहा जिल्ह्यांमध्ये लांडगा संवर्धन प्रकल्प राबवण्याचा प्रस्ताव 'ग्रासलँड ट्रस्ट' आणि 'अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकॉलॉजी अँड एन्व्हायर्न्मेंट' (ATREE) या संस्थांनी मांडला आहे.

'ग्रासलँड ट्रस्ट' या संस्थेने वन विभाग आणि ग्रामस्थांच्या सहभागातून सासवड, जेजुरी, सुपे, दिवे घाटातील माळराने आणि लांडग्यांविषयी माहिती गोळा केली आहे. या कामाचा पुढचा टप्पा म्हणजे लांडग्यांच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष प्रयत्न करणे. त्यासाठी माळरानांना संरक्षण द्यावे लागणार आहे. तिथल्या मानवी हस्तक्षेप आणि चराईसाठी येणाऱ्या गुरांवर नियंत्रणाची गरज संस्थेनं व्यक्त केली आहे.

लांडग्यांच्या वर्तणुकीच्या सखोल अभ्यासासाठी संस्थेने जर्मनीतील एका संस्थेच्या मदतीने 'वुल्फ अँड पॅक बिहेविअर' प्रकल्प हाती घेतला आहे. दोन वर्षांच्या या प्रकल्पाला साधारण यंदाच्या मार्च महिन्यात सुरुवात झाली. प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या माळरानांवरील लांडग्यांच्या पाच कळपांवर ड्रोनच्या मदतीने लक्ष ठेवून नोंदी घेतल्या जात आहेत. त्यासाठी वन कर्मचारी आणि स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देऊन अभ्यासात सहभागी करून घेतले आहे.

प्राथमिक माहितीनुसार लांडग्यांचा सर्वाधिक वावर असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश होतो. प्रामुख्याने दख्खनचे पठार, धुळे, नंदुरबार, नाशिक, छत्रपती संभाजीनगरमध्ये लांडगे आढळतात. पुणे जिल्ह्यात ५०पेक्षा अधिक लांडग्यांची नोंद झाली आहे.

**स्रोत** - चैत्राली चांदोरकर. 'राज्यातील लांडग्यांची संख्या वाढवण्यासाठी खास प्लॅन, काय आहे लांडगा संवर्धनाचे 'पुणे मॉडेल'?' *maharashtratimes.com*, ०१.१०.२०२३.

कोकण

## ऑलिव रिडले कासवांच्या उपग्रहाधारित अंकन संनियंत्रणाचा प्रकल्प – घटनाक्रम



कोकण किनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी येणाऱ्या समुद्री कासवांना उपग्रहाधारित उपकरणाच्या साह्याने अंकन करून त्यांच्या समुद्रातील प्रवासाविषयी अधिक माहिती मिळवण्यासाठी अभ्यास सुरू आहे. राज्याचा कांदळवन कक्ष आणि 'वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' यांच्या सहयोगाने समुद्री कासवांच्या प्रवासावर लक्ष ठेवण्याचा अर्थात संनियंत्रणाचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १, खंड ३ अंक २, खंड ३ अंक ३, खंड ४ अंक २, खंड ४ अंक ३*)

या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून आजतागायत घटनाक्रम पुढील प्रमाणे -

ऑक्टोबर २०२०

'मँग्रूव अँड मरीन बायोडायवर्सिटी कॉन्झर्वेशन फाउण्डेशन ऑफ महाराष्ट्र' या शासनाच्या स्वायत्त संस्थेने राज्याच्या किनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी येणाऱ्या ऑलिव रिडले कासवांना उपग्रहाधारित अंकन करण्यासाठी ९.८७ लाख रुपयांचा निधी मंजूर केला.

'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) तील वैज्ञानिकांच्या मदतीने या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे ठरले.

जानेवारी २०२२

रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तर भागात असलेल्या वेळास व आंजर्ले या समुद्रकिनाऱ्यांवर अनुक्रमे प्रथमा आणि सावनी या दोन मादी ऑलिव रिडले कासवांना उपग्रहाधारित अंकन केले. त्यानंतर त्यांना पुन्हा त्या त्या समुद्रकिनाऱ्यावर सोडले.

फेब्रुवारी २०२२

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर समुद्रकिनाऱ्यावर उपग्रहाधारित अंकन करून आणखी तीन मादी ऑलिव रिडले कासवे – वनश्री, रेवा आणि लक्ष्मी यांना त्याच किनाऱ्यावर सोडले.

जानेवारी महिन्यात अंकन केलेल्या प्रथमाने किनाऱ्यावरून दक्षिणेकडे ७५ किमी प्रवास केला व त्यानंतर ती गुजरातकडे वळली. या काळात सावनी मात्र किनाऱ्यालगत उथळ समुद्रातच वावरत होती व तिने आंजर्ल्याच्या किनाऱ्यावर पुन्हा एकदा अंडी घातली. त्या वीणीच्या हंगामात अंडी घालण्याची ही तिची दुसरी किंवा कदाचित तिसरीही वेळ असावी.

एप्रिल २०२२

प्रथमा दीवच्या किनाऱ्यापासून समुद्रात ६५ किमी अंतरावर होती; तिथे पोहोचण्यासाठी वेळासच्या समुद्रात सोडल्यापासून तिने वायव्येकडे सरळ रेषेत ३३० किमी अंतर कापले होते. सावनी महाराष्ट्राच्या किनाऱ्यापासून ९० किमी अंतरावर समुद्रात होती.


वनश्री दक्षिणेकडे निघाली होती. रत्नागिरी जिल्ह्यातील आंबोळगड किनाऱ्यापासून २५ किमी अंतरावर समुद्रात ती होती. रेवाने गोवा ओलांडून कर्नाटकाच्या हद्दीतील समुद्रात प्रवेश केला होता. कारवारच्या किनाऱ्यापासून ४० किमी आत समुद्रात ती होती.

मे २०२२

वेळास समुद्रकिनाऱ्यापासून ८० किमी अंतरावर समुद्रात प्रथमाच्या स्थानाची नोंद झाली. वेळासच्याच किनाऱ्यावर प्रथमाने अंडी घातली होती, तिथे ती परतल्याचे कळले.

प्रथमा वेळासकडे परतून येईल ही शक्यता लक्षात घेतली नव्हती, असे WII चे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. आर सुरेश कुमार यांनी सांगितले. एकेकट्याने अंडी घालण्यासाठी येणारी ही कासवे खोल समुद्रात जाऊन मग परतून येतील असा सिद्धांत सुरुवातीला वैज्ञानिकांनी मांडला होता. मात्र,

बागेश्री व गुहा या ऑलिव रिडले समुद्री कासवांचा प्रवासाचा मार्ग (‘मँग्रूव फाउण्डेशन’च्या ‘इन्टाग्राम’वरून साभार)



अंकन केलेली सर्व कासवे खोल समुद्रात न जाता किनारपट्टीलगत राहिल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

ऑगस्ट २०२२

अंकन केलेल्या पाच कासवांपैकी फक्त वनश्रीशी संपर्क राहिला होता. प्रथमा, सावनी, रेवा आणि लक्ष्मी या चारही कासवांशी रेडिओ संपर्क तुटला. अंकनादरम्यान कासवांना लावलेली उपकरणे हरवली असावीत, असे 'मँग्रूव फाउण्डेशन'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

फेब्रुवारी २०२३

गुहागरच्या समुद्रकिनाऱ्यावर दोन मादी ऑलिव रिडले कासवांना उपग्रहाधारित अंकन करून समुद्रात परत सोडण्यात आले. या कासवांना बागेश्री आणि गुहा अशी नावे देण्यात आली.

जून २०२३

गुहा कर्नाटकाच्या हद्दीतील समुद्रात पोहोचली असून तिचा दक्षिणेकडे प्रवास सुरू असल्याचे आढळले. दक्षिणेकडे निघालेली बागेश्री लक्षद्वीपच्या समुद्रात पोहोचली होती.

जुलै २०२३

पहिल्या आठवड्यात बागेश्री श्रीलंकेजवळील समुद्रात होती.

सप्टेंबर २०२३

बागेश्री बंगालच्या उपसागरात पोहोचली. गुहाचा कर्नाटकच्या किनाऱ्यालगत वावर.

त्यानंतर सप्टेंबर महिन्यात अंकनाची उपकरणे बंद पडल्याची माहिती कांदळवन कक्षातील अधिकाऱ्यांनी वैयक्तिक संवादादरम्यान दिली.

**स्रोत** – 'काय सांगता? चक्क वाघ आणि कासवात रंगलीय स्पर्धा! नेमका काय आहे प्रकार? जाणून घ्या,' *www.loksatta.com*, २७.०९.२०२३.

'गुहागरचे ऑलिव्ह रिडले कासव पोहोचले थेट श्रीलंकेत; उपग्रह टॅग केलेल्या 'बागेश्री'चा अवघ्या चार महिन्यातला थक्क करणारा प्रवास,' *www.loksatta.com*, ०६.०७.२०२३.

रणजीत जाधव. 'Maharashtra: Ratnagiri se Kanyakumari in just four months,' *www.mid-day.com*, १८.०६.२०२३.

संदीप बोडवे. 'अँटिनावाले कासव पोहोचले लक्षद्वीप समुद्रात, दुसऱ्या कासवाचा वेग मंदावला,' *www.lokmat.com*, १५.०६.२०२३.

विजय सिंह. 'Two more Olive Ridley turtles satellite tagged in Ratnagiri,' *timesofindia.indiatimes.com*, २३.०२.२०२३.

अरूण आडिवरेकर. 'सॅटेलाईट टॅगिंग केलेले वनश्री कासव संपर्कात, सहा महिन्यांपूर्वी सोडले होते समुद्रात,' *www.lokmat.com*, २३.०८.२०२२.

संजना भालेराव. 'Maharashtra: First Olive Ridley turtle satellite-tagged on state coast returns near nesting beach,' *indianexpress.com*, १८.०५.२०२२.

रणजीत जाधव. 'Tagged turtles reach Gujarat, Karnataka from Maharashtra,' *www.mid-day.com*, ०८.०४.२०२२.

'Maharashtra's 1st satellite-tagged Olive Ridley turtle swims 250 km from state, may soon enter Gujarat waters,' *indianexpress.com*, २५.०३.२०२२.

संजना भालेराव. 'Maharashtra: Tagged turtle returns to lay eggs; confirms nesting behaviour,' *indianexpress.com*, २३.०२.२०२२.

संजना भालेराव. 'Satellite tagging of 5 female Olive Ridley turtles from Maharashtra coastline concludes,' *indianexpress.com*, १७.०२.२०२२.

प्रयाग अरोरा-देसाई. 'Three more Olive Ridley turtles satellite tagged in Maharashtra's Ratnagiri,' *www.hindustantimes.com*, १६.०२.२०२२.

संजना भालेराव. 'Rs 9.87 lakh project: Maharashtra govt nod for satellite tagging of Olive Ridley turtles along state coast,' *indianexpress.com*, २८.१०.२०२०.

## पश्चिम महाराष्ट्र

### जेजुरीजवळ पिंगोरी गावात गिधाड संवर्धन केंद्र



गिधाडांच्या संवर्धन आणि प्रजननासाठी पुणे जिल्ह्यात केंद्र उभारण्यात येत आहे. वन विभाग आणि 'इला फाउण्डेशन' यांच्यात या प्रकल्पासाठी १० वर्षांचा करार झाला असून, जेजुरीजवळ पिंगोरी गावामध्ये केंद्राची उभारणी सुरू झाली आहे. वर्षभरात केंद्र कार्यान्वित होणार असून, तिथे राज्यातील गिधाडांच्या जिप्स बेंगालेन्सिस आणि जिप्स इंडिकस या दोन प्रजातींचे संवर्धन करण्यात येणार आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने देशातील गिधाडांच्या संवर्धनासाठी कृती आराखडा तयार केला आहे. या अंतर्गत देशाच्या वेगवेगळया भागांत गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे उभारण्यात येत आहेत. पुणे जिल्ह्यातील केंद्र इला फाउंडेशनच्या पिंगोरी इथल्या विलू सी. पूनावाला वन्य प्राणी उपचार केंद्राच्या आवारात उभारले जात आहे.

प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) माहिप गुप्ता, मुख्य वनसंरक्षक प्रवीण एन. आर., इला फाउण्डेशनचे संचालक डॉ. सतीश पांडे यांच्यासह डॉ. सतीश करमळकर केंद्राची मुख्य जबाबदारी सांभाळणार आहेत.

यापूर्वी राज्यात नाशिक वन विभागाने २०११ साली त्र्यंबकेश्वरमधील मौजे खोरीपाडा वन क्षेत्रात 'गिधाड उपाहारगृहा'चा उपक्रम राबवला. या उपक्रमाबद्दल तिथल्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीला २०१४ मध्ये विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले. पुणे वन विभागाने मावळ तालुक्यातही अलीकडेच गिधाड उपाहारगृह उभारले आहे.

'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' आणि 'रॉयल सोसायटी फॉर द प्रोटेक्शन ऑफ बर्डस्' यांच्या सहभागातून हरयाणा, पश्चिम बंगाल आणि असम या राज्यांमध्ये अनुक्रमे पिंजोर, बुक्साराणी आणि गुवाहाटी इथे गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे सुरू केली आहेत. या केंद्रांमध्ये गिधाडांची संख्या सुमारे २५० आहे.

**स्रोत** - चैत्राली चांदोरकर. 'महाराष्ट्रातील पहिले गिधाड संवर्धन, प्रजनन केंद्र पुण्यात; जेजुरीजवळील पिंगोरी येथे उभारणी सुरू,' *maharashtratimes.com*, ०३.०९.२०२३.

## माणूस-बिबट्या

### पुणे जिल्ह्यात या वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत ४६ बिबट्यांचा मृत्यू

अपघाती मृत्यूंबरोबरच हद्द प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात होणाऱ्या आपापसांतील झुंजीमध्ये होणारे बिबट्यांचे मृत्यू वाढले आहेत. गेल्या नऊ महिन्यांत पुणे जिल्ह्यात ४६ बिबट्यांचा मृत्यू झाला असून, यातील सर्वाधिक म्हणजे ४०% मृत्यू बिबट्यांच्या आपापसांतील झुंजींमध्ये झाल्याची माहिती पुढे आली आहे. तसेच, गेल्या नऊ महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यात १४ व्यक्ती जखमी झाल्या असून चार नागरिकांचा मृत्यू झाला.

वन विभागाच्या आकडेवारीनुसार, पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने जुन्नरसह आंबेगाव, शिरूर, मावळ, मुळशी भागातील बिबट्यांची संख्या वाढली आहे. जानेवारी ते मार्च हा ऊस तोडणीचा हंगाम असतो. एरवी ऊसाच्या शेतात राहणारे बिबटे या काळात इतरत्र जातात. आईपासून वेगळी झालेली बिबट्यांची तरुण पिल्ले स्वतःची हद्द प्रस्थापित करण्यासाठी जागा शोधतात. अशा वेळी प्रौढ बिबटे आणि या पिल्लांमध्ये झुंजी होतात आणि त्यामध्ये अनेक वेळा पिल्लांचा मृत्यू होतो.

वन विभागाकडील नोंदींनुसार, या वर्षी हद्दीसाठी झालेल्या झुंजींमध्ये बिबट्यांचे सर्वाधिक मृत्यू झाले आहेत. त्या पाठोपाठ रस्ते अपघातात - वाहनाची धडक बसल्याने, भक्ष्याच्या मागे पळताना विहिरीत पडल्याने बिबट्यांचे मृत्यू झाले आहेत. काही बिबट्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. अपघातात कायमस्वरुपी अपंगत्व आलेल्या बिबट्यांची संख्या मृत्यूच्या संख्येपेक्षा दुप्पट आहे. बिबट्यांच्या अपघाती मृत्यूंच्या घटनांमध्ये नाशिक आणि पुणे जिल्हा अग्रस्थानी आहे. कात्रज, हडपसर, उरुळीकांचन, वडगाव, मावळ, हिंजवडी, पौड या भागात रात्री उशिरा आणि

सकाळी लवकर शेतालगतच्या रस्त्यांवर बिबट्या दिसल्याच्या घटना वाढल्या आहेत.

उपनगर, गावपातळीवरील रस्त्यांचे जाळे वाढले, डांबरी रस्त्यांमुळे वाहनांचा वेग वाढला, रात्रीचा प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढली, वर्दळीमुळे वन्य प्राण्यांच्या वावरावर निर्बंध आले या बिबट्यांच्या वाढत्या अपघाती मृत्युंना कारणीभूत ठरत असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

जुन्नर वन विभागाने विहिरींना जाळ्या बसवण्याची मोहीम सुरू केली आहे. गेल्या काही महिन्यांत १४ विहिरींना जाळ्या बसवल्या असून, वर्षभरात ४५ विहिरींचे उद्दीष्ट ठेवले आहे, अशी माहिती जुन्नर वन विभागाच्या सहाय्यक वनसंरक्षकांनी दिली.

**स्रोत** – चैत्राली चांदोरकर. 'पुण्यात बिबट्यांच्या मृत्यूमागील धक्कादायक कारण समोर; तब्बल ४० टक्के मृत्यू हद्दीच्या संघर्षातून!' *maharashtratimes.com*, ०५.१०.२०२३.

### गोंदिया जिल्ह्यात वीजवाहक तारांचा वापर करून तीन बिबट्यांची शिकार; चौघांनी दिली कबुली

गोंदिया जिल्ह्यातील देवरी-आमगाव मार्गावरील वडेगाव जंगल शिवारात वीजवाहक तारांच्या संपर्कात आल्याने एक बछडा आणि दोन प्रौढ अशा तीन बिबट्यांचा मृत्यू झाला. ही घटना २८ ऑगस्ट रोजी रात्री उघडकीस आली. वीजवाहक तारांचा वापर करून बिबट्यांची शिकार

## संघर्षविषयक घटनांचे संक्षिप्त वृत्त

| जिल्हा - तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|
| नाशिक - सिन्नर | नायगावात दुचाकीस्वार शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला; प्रतिकार करताना शेतकरी गंभीर जखमी | महाराष्ट्र टाइम्स ३१.०७.२०२३ |
| | कुंदेवाडीत घराच्या आवारात बांधलेला पाळीव कुत्रा बिबट्याच्या हल्ल्यात ठार | सकाळ ११.०९.२०२३ |
| | निमगाव देवपूर इथे बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी | सकाळ १२.०९.२०२३ |
| | नाशिक पुणे महामार्गावर मोहदरी घाटात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | सकाळ २०.०९.२०२३ |
| | भोजापूर खोऱ्यातील कासारवाडीत विहिरीत पडलेल्या बिबट्याची वन विभागाने केली सुटका | सकाळ २१.०९.२०२३ |
| | नायगाव खोऱ्यात एका रात्रीत बिबट्याचे दोन मोटारसायकलस्वारांवर हल्ले; एका हल्ल्यात महिला जखमी व दुसऱ्या हल्ल्यात शाळकरी विद्यार्थी जखमी | सकाळ ०३.१०.२०२३ |
| | नायगाव खोरे भागात एकाच ठिकाणी सलग तीन दिवसांत चार बिबटे जेरबंद | सकाळ १५.१०.२०२३ |
| पुणे - आंबेगाव | थोरांदळे फुटाणे मळा भागात मेंढपाळ वाड्याबाहेर झोपलेल्या ७ महिन्यांच्या बाळाला बिबट्याने उचलले, मात्र, आईने प्रतिकार करत केली बाळाची सुटका | महाराष्ट्र टाइम्स ११.१०.२०२३ |
| वर्धा - वर्धा | महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ परिसरातून जेरबंद केलेल्या बिबट्याचा संशयास्पदरित्या मृत्यू | सकाळ २१.०७.२०२३ |
| सातारा - कराड | गमेवाडीत बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | सकाळ ०६.०९.२०२३ |

झाल्याचे घटनास्थळी आलेल्या वन कर्मचाऱ्यांना प्राथमिक तपासात दिसून आले. त्यामुळे वन विभागाने तातडीने पुढील चौकशी करून आठ संशयितांना ताब्यात घेतले. पैकी चौघांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांना अटक झाली.

या गुन्ह्यात आणखीही व्यक्ती सहभाग असल्याची शक्यता लक्षात घेऊन तपास सुरू असल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**स्रोत** – 'वीजप्रवाहाद्वारे तीन बिबट्यांची शिकार,' *www.esakal.com*, ३०.०८.२०२३.



## आंतरराज्यीय बातम्या

महाराष्ट्र/छत्तीसगढ

### चंद्रपुरातून पकडलेल्या वाघिणीला छत्तीसगढमधील व्याघ्र प्रकल्पात पाठवणार

महाराष्ट्रातील चंद्रपूर वनवृत्तातील मोरवा जंगलात ७ ऑगस्ट रोजी पकडण्यात आलेल्या अडीच वर्षांच्या वाघिणीला गोरेवाडा वन्यप्राणी बचाव केंद्रात ठेवले आहे. तिला लवकरच छत्तीसगढमधील अचानकमार व्याघ्र प्रकल्पात पाठवण्यात येणार आहे. व्याघ्र गणनेच्या २०२२ च्या अहवालानुसार या प्रकल्पात सध्या पाच वाघ आहेत.

छत्तीसगढचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वाघ हवा असल्याचे पत्र पाठवले होते. त्यानुसार शिंदे यांनी राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता यांना छत्तीसगढला वाघ पाठवण्याबाबत पत्र पाठवले.

मोरवा नियतक्षेत्रातील वांध्री इथे पकडलेल्या वाघिणीला जंगलात सोडण्यापूर्वी काही काळ गोरेवाडा बचाव केंद्रात ठेवण्याचा निर्णय झाला. छत्तीसगढला तिला पाठवता येईल का, हे ठरवण्यासाठी गोरेवाडा प्रशासनाने वाघिणीविषयीचा अहवाल दिला. त्यात या वाघिणीने माणसावर हल्ला केला नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे तिला छत्तीसगढच्या जंगलांत सोडण्यास हरकत नसल्याचे म्हटले आहे. 'नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी' (NTCA) ने या निर्णयाला मान्यता दिली आहे, अशी माहिती गुप्ता यांनी दिली.

यापूर्वी गोरेवाडा बचाव केंद्रातील चार वाघ आणि चार बिबटे गुजरातच्या जामनगर इथे आणि एक वाघ छत्तीसगढमधील प्राणिसंग्रहालयात ठेवण्यासाठी पाठवल्याचे वृत्तात दिले आहे.

दरम्यान, विदर्भातील ब्रम्हपुरी आणि गडचिरोली विभागातून नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सोडलेल्या दोन वाघिणी (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक ३*) मध्यंतरी छत्तीसगढमध्ये जाऊन आल्याचे त्यांना लावलेल्या रेडिओ कॉलरमुळे दिसून आले.

**स्रोत** – 'विदर्भातील वाघीण जाणार छत्तीसगडला', *www.esakal.com*, १७.०९.२०२३.

## राष्ट्रीय बातम्या

### 'स्टेट ऑफ इंडियाज् बर्ड्स 2023' अहवाल



सिटीझन सायन्स अर्थात नागरिकांनी विज्ञानाशी संबंधित बाबींची निरीक्षणे करून गोळा केलेल्या माहितीच्या आधारे राबवल्या जाणाऱ्या विविध विषयांवरील प्रकल्पांतील एक महत्त्वाचा विषय म्हणजे पक्षी निरीक्षण. भारतातील पक्ष्यांची निरीक्षणे नागरिकांच्या माध्यमातून नोंदवून घेत १३ संस्थांनी एकत्र येऊन तयार केलेला अहवाल 'स्टेट ऑफ इंडियाज् बर्ड्स 2023' हा २५ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली इथे प्रकाशित करण्यात आला. ही या अहवालाची दुसरी आवृत्ती आहे. पहिली आवृत्ती तीन वर्षांपूर्वी प्रकाशित झाली.

देशभरातील ३०,००० पक्षीनिरीक्षकांनी नोंदवलेल्या ३० लाख निरीक्षणांच्या आधारे यंदाचा अहवाल संकलित करण्यात आला आहे. त्यामध्ये पक्ष्यांच्या ९४२ प्रजातींच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली आहे.

भारतातील पक्ष्यांची स्थिती जागतिक पातळीवरील स्थितीशी मिळतीजुळती आहे. विविध प्रकारच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता असलेल्या, पर्यावरणशास्त्रात ज्यांना 'जनरलिस्ट' प्रजाती म्हणतात अशा प्रजातींपैकी पक्ष्यांच्या काहीच प्रजातींची स्थिती चांगली आहे. मात्र, बऱ्याचशा प्रजातींच्या संख्येत कमीजास्त प्रमाणात घट होत असल्याचे दिसून आले आहे. इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर (IUCN) रेड लिस्ट मधील माहितीनुसार, पक्ष्यांच्या ४९% प्रजातींच्या संख्येत जगभरात घट होत आहे व तुलनेने अवघ्या ६% प्रजातींच्या संख्येत वाढ होत आहे. भारतात रॉक पिजन अर्थात सर्वत्र पसरलेले कबूतर, ॲशी प्रिनिआ, एशिअन कोएल (कोकिळा), इंडिअन पिफाऊल (मोर) या जनरलिस्ट प्रजातींची स्थिती उत्तम आहे. बाया वीवर (सुगरण), पाइड बुशचाट (गप्पीदास) यांची संख्या तुलनेने स्थिर आहे. मात्र, व्यापक परिस्थिती लक्षात घेता चित्र निराशाजनक आहे.

अभ्यासलेल्या पक्ष्यांच्या ३४८ प्रजातींपैकी ६०% प्रजातींमध्ये संख्येत दीर्घकालीन घट होताना दिसून आली आहे; तर वार्षिक स्थितीपुरत्या अभ्यासलेल्या ३५९ प्रजातींपैकी ४०% प्रजातींची संख्या सध्या घटत असल्याचे दिसून आले आहे. ही घट सर्व प्रजातींमध्ये एकसमान नाही मात्र अभ्यासांती पक्ष्यांच्या वेगवेगळ्या गटांमध्ये याबाबत काही साम्य आढळून आले आहे.

ठराविक प्रकारच्या अधिवासातच जगू शकतील अशा प्रजाती – यांना पर्यावरणशास्त्रात 'हॅबिटॅट स्पेशालिस्ट' असे म्हणतात – विशेषतः माळराने आणि इतर खुले अधिवास, पाणथळ जागा आणि जंगल या अधिवासांमध्ये राहणाऱ्या प्रजातींच्या पक्ष्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. खाद्यनिहाय वर्गीकरणानुसार मिश्राहारी, फळभक्षी व मध खाणाऱ्या पक्ष्यांच्या तुलनेत मांसाहारी, कीटकभक्षी व दाणे खाणाऱ्या पक्ष्यांची संख्या वेगाने घटत आहे. स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांना स्थलांतर न करणाऱ्या पक्ष्यांच्या तुलनेत जास्त धोके आहेत.

सह्याद्री, ज्याला पश्चिम घाट असेही म्हणतात तो भाग आणि श्रीलंकेतील प्रदेशनिष्ठ प्रजातींची परिस्थिती अन्य प्रजातींच्या तुलनेत अत्यंत गंभीर आहे.

खुल्या अधिवासातील बस्टर्ड्स, कोर्सर्स या प्रजाती, नदीकाठालगत वालुकामय पट्ट्यात घरटी करणारे स्किमर्स व काही टर्न पक्षी, मोकळ्या प्रदेशातील शिकारी पक्षी आणि अनेक बदके अशा काही ठराविक गटांतील पक्ष्यांची परिस्थिती बिकट आहे.

सामान्य प्रजातींपैकी मोठ्या संख्येने प्रजातींना धोका असल्याचे अहवालात नोंदवले आहे. तसेच ज्या प्रजातींविषयी पुरेशी निरीक्षणे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या संवर्धनविषयक स्थितीबाबत भाष्य करणे अशक्य आहे अशा प्रजातींचे प्रमाण लक्षणीय आहे. अहवालात समाविष्ट असलेल्या ९४२ प्रजातींपैकी ४४% प्रजातींबाबत दूरगामी बदलांविषयी निरीक्षणे उपलब्ध नाहीत आणि ३१% प्रजातींबाबत वार्षिक बदल नोंदवणेही शक्य झालेले नाही.

अहवालातील महत्त्वपूर्ण मुद्दे पुढीलप्रमाणे,

- भारतातील पक्ष्यांच्या ९४२ प्रजातींच्या संवर्धनाची स्थितीबाबत मूल्यांकन
- ३०,००० पक्षीनिरीक्षकांनी नोंदवलेल्या ३० लाख निरीक्षणांच्या आधारे पक्ष्यांची संख्या व व्याप्तीबाबत विश्लेषण
- गेल्या आठ वर्षात २१७ प्रजातींच्या पक्ष्यांची संख्या वाढती किंवा स्थिर
- गेल्या ३० वर्षांत २०४ प्रजातींच्या पक्ष्यांच्या संख्येत घट
- संवर्धनासाठी उच्च प्राधान्य गटात १७८ प्रजाती
- इंडियन रोलर या पक्ष्यासह १४ प्रजातींची IUCN रेड लिस्ट पुनर्मूल्यांकनासाठी शिफारस
- गेल्या ३० वर्षांत कोकिळेच्या संख्येत वाढ
- मोराच्या संख्येत सातत्याने वाढ
- खुल्या परिसंस्था, नद्या आणि किनारी भाग आदी कळीच्या अधिवासांमध्ये राहणाऱ्या पक्ष्यांच्या संख्येत घट
- शिकारी पक्षी, किनाऱ्यावर येणारे स्थलांतरीत पक्षी आणि बदकांच्या संख्येत सर्वाधिक घट
- भारतात पक्ष्यांना असलेल्या आठ प्रकारच्या धोक्यांची अहवालात दखल

- देशातील विविध ठिकाणी केलेल्या अभ्यासांच्या समावेशामुळे पद्धतशीर पक्षी संनियंत्रणाचे महत्त्व अधोरेखित
- संवर्धनासाठी उच्च प्राधान्य गटातील प्रजातींकडे लक्ष पुरवण्यासाठी, दुर्लक्षित अधिवासांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आणि संशोधन व संनियंत्रणाला प्रोत्साहन देण्यासाठी धोरण व कृती यांच्या समन्वय साधून आखणीची गरज

अहवाल तयार करण्यासाठी योगदान दिलेल्या संस्थांची नावे – 'अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकॉलॉजी अँड द एन्वॉयर्न्मेंट', 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस्', 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स', 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी', 'फाउण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सिक्युरिटी', 'नेचर कॉन्झर्वेशन फाउण्डेशन', 'नॅशनल बायोडायवर्सिटी ऑथॉरिटी', 'नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस्', 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च', 'सालीम अली सेंटर फॉर ऑर्निथोलॉजी अँड नॅचरल हिस्ट्री', 'वेटलँड्स इंटरनॅशनल' – साऊथ एशिया, 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया', 'वाइल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया', 'वर्ल्डवाईड फंड फॉर नेचर' – इंडिया आणि 'झूलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया'.

संपूर्ण अहवाल पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहे - https://stateofindiasbirds.in

**स्रोत** – 'स्टेट ऑफ इंडियाज् बर्ड्स २०२३ अहवाल', पत्रक *https://stateofindiasbirds.in*, २५.०८.२०२३.



**वर्ष २०२२ च्या गणनेनुसार भारतात ३,६८२ वाघ**




भारतात सध्या ३,६८२ वाघ असून वर्ष २०१८ मधील २,९६७ वाघांच्या तुलनेत ही संख्या २४ टक्क्यांनी जास्त आहे. दर चार वर्षांनी होणाऱ्या अखिल भारतीय व्याघ्र गणनेचा वर्ष २०२२ चा सविस्तर अहवाल आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनी २९ जुलै रोजी प्रकाशित करण्यात आला.

'स्टेटस ऑफ टायगर्स – को-प्रिडेटर्स अँड प्रे इन इंडिया – 2022' हा अहवाल केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे यांनी कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पात जाहीर केला.

'प्रोजेक्ट टायगर'ची ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कर्नाटकात मैसुरू इथे ९ एप्रिल २०२३ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ च्या व्याघ्र गणनेचा दाखला देऊन देशात ३,१६७ वाघ असल्याची घोषणा केली होती. 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'चे संचालक वी.के. तिवारी यांनी ३,१६७ ही संख्या गणनेदरम्यान काढलेल्या वाघांच्या फोटोवरून निश्चित केल्याचे सांगितले. अंतिम अहवालात दिलेली ३,६८२ ही संख्या फोटोंसह वाघांच्या पाऊलखुणा, विष्ठा आदी माहितीच्या विश्लेषणांती काढल्याचे तिवारी यांनी स्पष्ट केले.

देशात मध्य प्रदेशात २०१८ च्या गणनेनुसार ५२६ वाघ होते. ही संख्या ४९ टक्क्यांनी वाढून ७८५ झाली आहे. कर्नाटकात ७.४% वाढ झाली असून तिथे ५६३ वाघ आहेत. सर्वाधिक व्याघ्र संख्येच्या क्रमवारीत मध्य प्रदेश, कर्नाटकापाठोपाठ तिसऱ्या क्रमांकावर उत्तराखंड असून या राज्यात २६.७% वाढ झाली आहे. उत्तराखंडात २०१८ च्या गणनेनुसार ४४२ वाघ होते ते २०२२ च्या गणनेत वाढून ५६० झाले आहेत.

सविस्तर आकडेवारी पुढील पानावर पाहा.

२०२२ च्या गणनेत ज्या राज्यांमध्ये वाघांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे अशा राज्यांची क्रमवारी

| क्रमवारी | राज्य | वाघांची संख्या |
|---|---|---|
| १ | मध्य प्रदेश | ७८५ |
| २ | कर्नाटक | ५६३ |
| ३ | उत्तराखंड | ५६० |
| ४ | महाराष्ट्र | ४४४ |
| ५ | तमिळ नाडू | ३०६ |
| ६ | असम | २२७ |
| ७ | केरळ | २१३ |
| ८ | उत्तर प्रदेश | २०५ |

प्रदेशनिहाय व्याघ्र संख्या

| प्रदेश | संख्या |
|---|---|
| मध्य भारत आणि पूर्व घाट | १४३९ |
| सह्याद्री (पश्चिम घाट) | १०८७ |
| शिवालिक टेकड्या व गंगेचे मैदान | ८१९ |
| ईशान्य भारतातील टेकड्या व ब्रह्मपुत्रेचे मैदान | २३६ |
| सुंदरबन | १०१ |

राज्यनिहाय वाघांच्या संख्येत झालेली घट

| राज्य | २०१८ | २०२२ |
|---|---|---|
| तेलंगण | २६ | २१ |
| छत्तीसगढ | १९ | १७ |
| झारखंड | ५ | १ |
| ओदिशा | २८ | २० |
| अरुणाचल प्रदेश | २९ | ९ |

महाराष्ट्रात २०१८ च्या गणनेत ३१२ वाघ होते. त्यात २९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. महाराष्ट्रात या गणनेत ४४४ वाघ असल्याची नोंद झाली आहे (सविस्तर वृत्त प्रादेशिक – राज्यव्यापी विभागात पाहा).

तमिळ नाडू, असम आणि केरळमध्ये अनुक्रमे ३०६, २२७ आणि २१३ वाघांची नोंद झाली आहे. उत्तर प्रदेशात २०१८ मध्ये १७३ वाघ होते; तिथे २०२२ मध्ये २०५ वाघ आहेत.

तसेच अहवालात व्याघ्र प्रकल्पनिहाय आकडेवारीही दिली आहे.

व्याघ्र प्रकल्पनिहाय वाघांची संख्या

| क्रमवारी | व्याघ्र प्रकल्प | व्याघ्र संख्या |
|---|---|---|
| १ | कॉर्बेट | २६० |
| २ | बंदीपूर | १५० |
| ३ | नागरहोळे | १४१ |
| ४ | बांधवगड | १३५ |
| ४ | दुधवा | १३५ |
| ५ | मुदुमलाई | ११४ |
| ६ | कान्हा | १०५ |
| ७ | काझीरंगा | १०४ |
| ८ | सुंदरबन | १०० |
| ९ | ताडोबा अंधारी | ९७ |

**स्रोत** - शिवानी आझाद. 'Pegged at 3,167 in April, India's tiger population now placed at 3,682,' *www.timesofindia.indiatimes.com*, ३०.०७.२०२३.

### पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये माणूस वन्यजीव संघर्षावर उपाययोजनेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर



'नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी', 'ग्लोबल टायगर फोरम', 'रिझॉल्व्ह' ही स्वयंसेवी संस्था आणि 'क्लेमसन युनिव्हर्सिटी'ने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'ट्रेलगार्ड एआय' तंत्रज्ञान विकसित केले आहे. माणूस वन्यजीव संघर्षाला आळा घालण्याच्या हेतुने त्याचा भारतात वापर केला जात आहे.

कान्हा-पेंच आणि तेराई आर्क भूप्रदेशांसह जवळपास पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये मे २०२२ पासून 'ट्रेलगार्ड एआय' वापरले जात आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वन्य प्राण्याचे छायाचित्र टिपून संबंधित

अधिकाऱ्यांपर्यंत ते अवघ्या ३० सेकंदात पोहोचवता येते. त्यामुळे जंगलालगतच्या गावांजवळ बफर क्षेत्रात असलेल्या वाघांचे निरीक्षण करता येणे सोपे झाले आहे.

भारतात या प्रणालीची चाचणी घेण्यापूर्वी हे तंत्रज्ञान दक्षिण आफ्रिकेत प्रभावीपणे वापरण्यात आले. सुरुवातीला हे तंत्रज्ञान वन्य प्राण्यांच्या शिकाऱ्यांचा मागोवा घेण्यासाठी तयार करण्यात आले होते. मात्र, त्यात पुढे संशोधन केल्यानंतर हत्ती, गेंडा, अस्वल, रानडुक्कर यासारखे सर्व प्राणी तसेच पक्ष्यांच्या प्रतिमादेखील यात टिपल्या जातात, हे स्पष्ट झाले. त्यामुळे वन्यजीव संरक्षणासाठीदेखील ते उपयुक्त ठरू शकते, असे वृत्तात नमूद केले आहे. या कॅमेऱ्यातील बॅटरी एकदा चार्ज केल्यानंतर अडीच हजारांहून अधिक प्रतिमा त्यातून टिपल्या जाऊ शकतात. 'ट्रेलगार्ड एआय'चे उत्पादन भारतात करण्यात आले आहे.

**स्रोत** - आता जंगलातला वाघ अवघ्या ३० सेकंदात मोबाईल आणि संगणकावर येणार, काय आहे हे 'ट्रेलगार्ड एआय' तंत्रज्ञान, *www.loksatta.com*, २१.०९.२०२३.

## गंगा नदीतील विविध प्रजातींच्या कासवांची तस्करी करणाऱ्या सहा जणांना अटक

गंगा नदीत आढळणाऱ्या विविध प्रजातींची ९५५ कासवे महसूल गुप्तचर संचालनालया- (DRI) - ने एक ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रासह मध्य प्रदेश व तमिळ नाडूत छापे टाकून जप्त केली व सहा तस्करांना अटक केली.

DRI च्या अधिकाऱ्यांना कासवांच्या तस्करीबाबत गुप्त टीप मिळाली होती. DRI च्या पथकाने नागपूर, भोपाळ आणि चेन्नई इथे छापे टाकून सहा तस्करांना अटक केली. तस्करांकडे इंडियन टेंट टर्टल, इंडियन फ्लॅपशेल टर्टल, क्राउन रिव्हर टर्टल, ब्लॅक स्पॉटेड/पॉन्ड टर्टल, ब्राउन रूफ टर्टल आदी प्रजातींच्या कासवांची ९५५ पिल्ले मिळाली. ३० सप्टेंबर रोजी झालेल्या या कारवाईला DRI ने 'ऑपरेशन कच्छप' असे नाव दिले होते. जप्त केलेली कासवे DRI ने वन विभागाच्या ताब्यात दिली.

**स्रोत** – 'डीआरआयचे ऑपरेशन 'कच्छप', गंगेतल्या ९५५ दुर्मिळ प्रजातींचे कासव वाचले, ६ तस्करांना बेड्या,' *maharashtratimes.com*, ०२.१०.२०२३.

## भारतात हत्तींचे किमान १५० भ्रमणमार्ग; 'प्रोजेक्ट एलिफंट' अंतर्गत अभ्यासातील निरीक्षण

भारतातील हत्तींचे अस्तित्व असलेल्या चार प्रदेशांतील १५ राज्यांमध्ये हत्तींचे किमान १५० भ्रमणमार्ग आहेत. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने 'प्रोजेक्ट एलिफंट' अंतर्गत केलेल्या अभ्यासात हे निरीक्षण नोंदवले आहे. केंद्र सरकारने वर्ष २०१० मध्ये प्रकाशित केलेल्या एलिफट टास्क फोर्सच्या 'गज' या अहवालात देशातील ८८ भ्रमणमार्गांची यादी दिली होती.

'एलिफंट कॉरिडॉर्स इन इंडिया' हा नवा अहवाल केंद्रीय मंत्रालयाचे 'प्रोजेक्ट एलिफंट', राज्यांचे वन विभाग यांनी एकत्र येऊन 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'कडून तांत्रिक मदत घेऊन तयार केला आहे.

अहवालानुसार, ५९ भ्रमणमार्गांचा हत्तींकडून वाढता वापर होत आहे आणि २९ भ्रमणमार्गांचा वापर जैसे थे आहे. अन्य २९ भ्रमणमार्गांच्या वापरात घट दिसून आली आहे; तर १९ भ्रमणमार्गांच्या सध्या होणाऱ्या वापराबाबत माहिती उपलब्ध नाही. एकूण भ्रमणमार्गांपैकी १५ मार्ग दुरवस्थेत असून त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्नांनी गरज आहे. दोन वर्षांच्या कालावधीत प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करून केलेल्या कामावर अहवालातील निष्कर्ष काढले आहेत.


अहवालात भ्रमणमार्गांविषयी दिलेली आकडेवारी पुढीलप्रमाणे –

- राज्यांच्या राजकीय सीमांतर्गत असलेले भ्रमणमार्ग – १२६
- दोन राज्यांमध्ये व्याप्ती असलेले भ्रमणमार्ग – १९
- आंतरराष्ट्रीय – सहा (हे भारत आणि नेपाळमध्ये असून भारतातील त्यांची व्याप्ती प्रामुख्याने उत्तर प्रदेशात आहे.)
- पूर्व मध्य भागातील भ्रमणमार्ग – ५२
- ईशान्येतील भ्रमणमार्ग – ४८
- दक्षिण भारतातील – ३२
- उत्तर भारतातील - १८

पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक २६ भ्रमणमार्ग असून देशातील हत्तींच्या वावरासाठी योग्य अशा १७ टक्क्यांहून अधिक भूखंडांचा त्यात समावेश आहे. ईशान्येकडील राज्यांमध्ये हत्तींची संख्या तुलनेने कमी असल्यामुळे त्यांच्या वावराविषयी मर्यादित माहिती उपलब्ध आहे.

हत्तींनी आपला वावर नव्याने वाढवला आहे अशीही काही राज्ये आहेत. छत्तीसगढला लागून असलेला महाराष्ट्रातील विदर्भाचा भाग, कर्नाटकाला लागून असलेला दक्षिण महाराष्ट्राचा भाग; खेरीज मध्य प्रदेशातील बांधवगड व संजय डुबरी हे व्याघ्र प्रकल्प आणि आंध्र प्रदेशाच्या उत्तर भागात ओदिशातून हत्ती येतात. या हत्ती नव्याने व्यापत असलेल्या प्रदेशांतील अधिवासांमध्ये हत्तींच्या संख्येला सामावून घेण्यासाठी त्यांच्या स्थितीचा दूरदृष्टी बाळगून अभ्यास होण्याची गरज अहवालात व्यक्त केली आहे. तसेच, नव्या प्रदेशांमध्ये हत्तींना योग्य असलेले भ्रमणमार्ग ओळखण्यासाठी माहितीवर आधारित अभ्यासाची आवश्यकता असल्याचे अहवालात म्हटले आहे.

वर्ष २०१७ मधील गणनेनुसार भारतात जवळपास ३०,००० हत्ती शिल्लक आहेत.



**स्रोत** - 'India has 150 elephant corridors spanning 15 range-states, West Bengal tops list: Report,' *www.telegraphindia.com*, १३.०९.२०२३.

**देशात उपऱ्या वनस्पतींच्या आक्रमणाचे प्रमाण चिंताजनक असल्याचा अभ्यासाचा निष्कर्ष**

वनस्पतींच्या उपऱ्या किंवा परकीय प्रजाती भारतातील नैसर्गिक अधिवासांपैकी २२% अधिवासांमध्ये पसरल्या असून त्यांच्यात जवळपास ६६% अधिवासात आक्रमण करण्याची क्षमता आहे, असा निष्कर्ष एका अभ्यासाने काढला आहे. परकीय प्रजातींच्या आक्रमणामुळे स्थानिक प्रजाती नष्ट होतात, खाद्याची उपलब्धता कमी होते व अधिवासाचा ऱ्हास होतो, असे अभ्यासात म्हटले आहे.

भारतातील २० राज्यांमधील व्याघ्र अधिवासाचा भाग असलेल्या ३,५८,००० चौ. किमी क्षेत्रावरील परकीय प्रजातींच्या व्याप्तीच्या अभ्यासावर आधारित शोधनिबंध ५ ऑक्टोबर रोजी प्रकाशित करण्यात आला. 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) संस्थेतील वैज्ञानिक निनाद अविनाश मुंगी, ओमार कुरेशी आणि संस्थेचे माजी अधिष्ठाता यादवेंद्र झाला यांनी केलेल्या हा अभ्यास केला असून त्यांचा शोधनिबंध 'जर्नल ऑफ अप्लाईड इकॉलॉजी' या विज्ञानपत्रिकेत प्रकाशित झाला आहे.

हा अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिकांनी ३,५८,५५० चौ. किमी क्षेत्रात पसरलेल्या १,५८,००० भूखंडांचे परीक्षण केले. त्यामध्ये सर्वाधिक आक्रमक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ११ प्रजातींवर त्यांनी लक्ष केंद्रीत केले. अभ्यासासाठी नमुन्यादाखल निवडलेल्या भूखंडांमध्ये ३१% अध्येमध्ये वृक्ष विखुरलेले आहेत अशी माळराने, ५१% शुष्क पानगळीची वने, ४०% आर्द्र पानगळीची वने, २९% निम सदाहरित वने, ४४% सदाहरित वने आणि ३३% आर्द्र माळराने असे प्रमाण होते.

अभ्यासांती दिसून आले की २२% नैसर्गिक अधिवासात उपऱ्या वनस्पतींच्या आक्रमणाचे प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे आणि सांख्यिकीच्या अनुमानानुसार ६६% क्षेत्राला या प्रजातींच्या आक्रमणाचा धोका आहे. अध्येमध्ये वृक्ष विखुरलेले आहेत अशा माळरानांतील परिस्थिती परकीय प्रजातींच्या आक्रमणासाठी सर्वाधिक (टक्केवारीनुसार ८७%) पोषक आहे. त्यापाठोपाठ पोषक परिस्थिती आर्द्र माळराने आणि शुष्क पानगळीच्या वनांमध्ये (प्रत्येकी ७२%) आहे. त्यामानाने सदाहरित वनांमध्ये आक्रमणासाठी परिस्थितीची पोषकता कमी (४२%) आहे.

अभ्यासलेल्या ११ प्रजातींमध्ये *लँटाना कमारा* सर्वाधिक आक्रमक आहे (संबंधित वृत्त पुढे पाहा). सुमारे ५०% नैसर्गिक अधिवासात तिची व्याप्ती आहे. *मिकानिआ मिक्रांता* या प्रजातीच्या आक्रमणाची व्याप्ती तुलनेने कमी असून ती प्रामुख्याने आर्द्र माळराने व वनांमध्ये आहे.

मध्य भारत आणि पश्चिम घाट प्रदेशांना परकीय प्रजातींच्या आक्रमणाचा धोका सर्वाधिक असल्याचे या अभ्यासात दिसून आले आहे. वर्ष २०२२ च्या व्याघ्र गणनेच्या आकडेवारीनुसार देशात असलेल्या एकूण ३,६८२ वाघांपैकी सुमारे निम्मे वाघ या प्रदेशांत आहेत. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने व्याघ्र अधिवासाला परकीय प्रजातींच्या आक्रमणापासून असलेला धोका लक्षात घेतला आहे. वाघांच्या संख्येचा अंदाज बांधण्यासाठी केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात मंत्रालयाने उपऱ्या प्रजातींच्या संनियंत्रणाचा मुद्दा समाविष्ट केला होता.

वर्ष २०१८ मध्ये झालेल्या व्याघ्रसंख्येच्या सर्वेक्षणात गोळा केलेल्या माहितीच्या आधारे WII च्या वैज्ञानिकांनी दाखवले की देशातील दोनतृतीयांश नैसर्गिक क्षेत्र परकीय वनस्पतींच्या एकापेक्षा जास्त प्रजातींच्या आक्रमणाखाली गेले असून त्यामागे मनुष्यनिर्मित कारणे आहेत. भारतीय वनांमध्ये पसरलेल्या परकीय वनस्पतींचे एका फटक्यात व्यवस्थापन करण्यासाठी १३.५ अब्ज अमेरिकी डॉलर्स निधी लागेल. हे व्यवस्थापन अवघड आणि खर्चिक असल्यामुळे किमान आक्रमण झालेल्या भागांमध्ये नैसर्गिक वनांच्या पुनरुज्जीवनाला प्राधान्य देण्याची शिफारस अभ्यासात केली आहे.

परकीय प्रजातींच्या आक्रमणाचा अंदाज घेण्यासाठी देशव्यापी सर्वेक्षण होण्याची ही पहिलीच वेळ असून या अभ्यासामुळे या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी धोरण आखण्याकरता सरकारला मदत होईल, असे झाला यांनी सांगितले.

**स्रोत** – चेतन चौहान. '20% of green areas in India invaded by invasive species: Study,' *www.hindustantimes.com*, 05/10/2023.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

### जगभरात उपऱ्या प्रजातींचे आक्रमण अभूतपूर्व वेगाने वाढत असल्याचा अभ्यासाचा निष्कर्ष

उपऱ्या किंवा परकीय प्रजातींचे आक्रमण जगभरात अभूतपूर्व दराने वाढत आहे. त्यामुळे स्थानिक जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण झाला असून त्याचे दुष्परिणाम आर्थिक क्षेत्रातही दिसून येतील. 'असेसमेंट रीपोर्ट ऑन इनवेसिव एलिअन स्पिशीज अँड देअर कंट्रोल' या अहवालात हा निष्कर्ष मांडला आहे. स्थानिक समुदायांच्या सुस्थितीवरही त्याचे दुष्परिणाम होतील असेही अहवालात म्हटले आहे.

जैवविविधता आणि परिसंस्था सेवांविषयक आंतरसरकारी मंच - IPBES च्या १४३ सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन हा अहवाल तयार केला आहे.

परकीय प्रजातींमुळे परिसंस्थांची कार्यक्षमता, वस्तू आणि सेवा प्रभावित होतात. उदाहरणार्थ – मूळ दक्षिण व मध्य अमेरिकेच्या अटलांटिक आणि पॅसिफिक किनाऱ्यांवरून केरळात आलेल्या कालवाच्या *मिटीलॉप्सिस सालेई* या प्रजातीने केलेल्या आक्रमणामुळे कालवे आणि शिंपल्यांच्या स्थानिक प्रजाती वेगाने नाहीशा होत आहेत. याचे दुष्परिणाम केरळातील मत्स्यसाठ्यांवर दिसून येत आहेत.

सर्वच परकीय प्रजाती आक्रमक नाहीत मात्र आक्रमक प्रजातींचे प्रमाण लक्षणीय आहे, याकडे अहवालाने लक्ष वेधले आहे. अहवालातील आकडेवारी सांगते की परकीय वनस्पतींपैकी ६%, अपृष्ठवंशी प्राण्यांपैकी १४% व सूक्ष्म जीवांपैकी ११% प्रजाती आक्रमक आहेत.

जगात ३७,००० परकीय प्रजाती असून त्यापैकी ३,५०० पेक्षा जास्त प्रजाती आक्रमक आहेत. जगातील वनस्पती आणि प्राण्यांच्या ६०% प्रजाती कायमच्या नष्ट होण्याला परकीय प्रजातींचे आक्रमण कारणीभूत असल्याचे अहवालात नोंदवले आहे. *पाँटेडेरिआ क्रॅसिपेस* (कॉमन वॉटर हायसिंथ) या वनस्पतीचे आक्रमण जगभरात सर्वाधिक आहे. त्यापाठोपाठ दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे *लँटाना कमारा* आणि *रॅटस रॅटस* (ब्लॅक रॅट) यांचे आक्रमण आहे.

जगभरात स्थानिक समुदायांच्या मालकीच्या, वापराच्या व व्यवस्थापनाखालील जमिनींवर २,३०० पेक्षा जास्त आक्रमक प्रजाती पसरल्या आहेत. या आक्रमणामुळे स्थानिक समुदायांची स्वायत्तता, हक्क आणि सांस्कृतिक ओळखीवर नकारात्मक परिणाम होतात. स्थानिक लोकसमुहांच्या उपजीविकेची पारंपरिक साधने व पारंपरिक ज्ञान यांचा ऱ्हास होतो, असे अहवालात नमूद केले आहे.



**स्रोत** – जितेंद्र चौबे. 'Invasive alien species causing serious biodiversity, economic threats, says report,' *www.newindianexpress.com*, ०५.०९.२०२३.

## विशेष लेख

### दोडामार्ग वन परिक्षेत्रातील खवलेमांजर वाचवा मोहीम

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी वन विभागामध्ये शिकारीच्या काही गुन्ह्यांमध्ये आरोपींनी दोडामार्ग भागातून खवलेमांजर (पँगोलीन) पकडल्याचे उघड झाले आहे. शिकारीच्या काही गुन्ह्यांत अटक करण्यात आलेले आरोपी पाहता महाराष्ट्रासह कर्नाटक, गोव्यातील वन्यजीव शिकारी व तस्करांचा दोडामार्ग तालुक्यात वावर असल्याचे दिसून आले आहे. सावंतवाडी वन विभागालगतच्या कोल्हापूर, सातारा व सांगली या वन विभागांमध्ये उघडकीस आलेल्या शिकारीच्या काही घटनांमध्ये कोकणात खवलेमांजर पकडून त्याची तस्करी झाल्याचे आढळले आहे.

अशा आव्हानात्मक परिस्थितीत स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने दोडामार्ग परिक्षेत्रातील वनकर्मचाऱ्यांनी केलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे -

**१. लोकसहभागासाठी जनजागृती**

दोडामार्ग परिक्षेत्र कार्यालयातील वनकर्मचारी वर्गाने 'खवलेमांजर वाचवा मोहिमे'त स्थानिकांना सामील करून घेण्यासाठी ग्रामसभा, गावांच्या जत्रा या सार्वजनिक मेळाव्यांच्या ठिकाणी प्रबोधन केले. खवलेमांजराचे परिसंस्थेतील महत्व लोकांना पटवून दिले, माहितीफलक लावले. खवलेमांजराविषयीच्या भ्रामक कल्पना, गैरसमज व अंधश्रद्धांच्या निराकरणासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था, निसर्गअभ्यासक यांची मदत घेतली.

**२. स्थानिक प्रथा, परंपरेची मोहिमेशी सांगड**

दोडामार्ग भागातील गावांमध्ये असलेल्या सातेरी मंदिरात वारुळाची पूजा करण्याची प्रथा आहे. वारुळात राहणाऱ्या मुंग्या, वाळवी हे खवलेमांजराचे प्रमुख खाद्य आहे. वारूळ पूजनाच्या सामाजिक प्रथेतून आपले पूर्वज या वन्यजीवाच्या संरक्षणाची महती सांगत आले आहेत, हे समाजमनावर बिंबवण्याचा हेतू त्यामुळे साध्य करता आला.

**३. नागरिकांसाठी प्रोत्साहनपर बक्षीसे**

मनुष्यवस्तीत खवलेमांजर आढळल्यास त्याला संरक्षण देऊन वन विभागाला कळवणाऱ्याला, खवलेमांजराचे प्राण वाचवणाऱ्याला 'खवलेमांजर संवर्धक' म्हणून परिक्षेत्र कार्यालयाकडून १००० रुपये प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाई. खवलेमांजर शिकारीविषयी वन विभागाला गुप्त बातमी देणाऱ्याचे नाव गुपित ठेवून प्रोत्साहनपर बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली.

**४. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रबोधन**

दोडामार्ग तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम आणि समाज माध्यमांचा वापर करून खवलेमांजराविषयी प्रबोधन केले. ही युवाशक्ती खवलेमांजर वाचवण्यासाठी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवू लागली.

**५. पोलीस खात्याशी समन्वय**

पोलीस खात्याच्या सहयोगाने शिकार रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. दोडामार्गच्या पोलीस निरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील सर्व गावांच्या पोलिसपाटलांची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये त्यांना खवलेमांजराच्या शिकारीसारखे वनगुन्हे रोखण्यासाठी काय करता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**६. परिक्षेत्र कार्यालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी वन कायद्यांबाबत प्रशिक्षण कार्यशाळा**

वन्यजीवांची शिकार व तस्करी करणाऱ्या अपप्रवृत्तींना कायदेशीर पायबंद घालण्यासाठी असलेल्या कायद्यांविषयी प्रशिक्षण कार्यशाळा क्षेत्रीय वन कर्मचाऱ्यांसाठी घेतल्या.

लोकसहभागातून खवलेमांजराच्या यशस्वी रक्षणाच्या घटना

ऑगस्ट २०२२: मौजे उगाडे गावातील शेतकरी सखाराम राणे यांनी आपल्या घराभोवती लावलेल्या नायलॉनच्या जाळीत अडकलेल्या खवलेमांजराविषयी तात्काळ वन विभागाला माहिती दिली. त्यामुळे त्या खवलेमांजराची सुखरूप सुटका करून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडणे शक्य झाले.

सप्टेंबर २०२२: मौजे पिकुळे इथे मनुष्यवस्तीत आलेल्या खवलेमांजराला कुत्र्यांपासून वाचवून ग्रामस्थांनी सुखरूप ठेवले. त्यानंतर त्यांनी लगेच वन परीक्षेत्र कार्यालयाला याबाबत माहिती दिली. त्यामुळे त्या खवलेमांजराला पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडता आले.

- **मदन अशोक क्षीरसागर**
वन परिक्षेत्र अधिकारी, सावंतवाडी वन विभाग
rfosawantwadi@gmail.com

**AVAILABLE AT 25% DISCOUNT**

## The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra
News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by

Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books




**Contents:**

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (ShibaDesor); 4)Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line-drawings by Ashvini Menon


**For copies at 25% discount write to** psekhsaria@gmail.com


## Books from the *PA Update* stable


The set of 3 available for a special 25% discounted price of Rs. 1000

1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line-drawings., Price: Rs. 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line-drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100-line drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, please write to** psekhsaria@gmail.com



# थोडक्यात पण महत्त्वाचे

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची ५० वर्षे आणि बेकायदा पुनर्वसन

मेळघाट व्याघ्र प्रकल्प हा माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी घोषित केलेल्या देशातील पहिल्या व्याघ्र प्रकल्पांपैकी एक आहे. आदिवासींचे वसतिस्थान असलेल्या मेळघाटातील धारणी व चिखलदरा या अनुसूचित क्षेत्रापासून सुरु झालेला मेळघाट व्याघ्र प्रकल्प आज पाच दशकांनंतर तीन जिल्ह्यांमध्ये चार वन्यजीव अभयारण्ये आणि एक राष्ट्रीय उद्यान असा विस्तारला आहे.

१५९७.२३ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर मेळघाट अभयारण्य घोषित करण्यासाठी ५ सप्टेंबर १९८५ रोजी पहिली अधिसूचना निघाली. त्यानुसार या क्षेत्रात ५८ गावांचा समावेश होता. २७ नोव्हेंबर १९८७ रोजी वन विभागाने ३६१.८ चौ. किमी क्षेत्रावर गुगामल राष्ट्रीय उद्यान अधिसूचीत केले. या क्षेत्रात कोणतेही गाव नव्हते. १९९४ मध्ये, गुगामल राष्ट्रीय उद्यानाची सीमा निश्चित करणारी अधिसूचना जारी झाली. त्यानुसार, राष्ट्रीय उद्यान आणि मेळघाट अभयारण्याच्या सीमा वेगवेगळ्या निश्चित करण्यात आल्या. अभयारण्याचे क्षेत्र कमी करून ११५०.०३ चौ. किमी करण्यात आले व अभयारण्यात महसुली गावांचा समावेश झाला. या क्षेत्रात २२ गावे आली.

अंबाबरवा अभयारण्यात संरक्षित वनांचा समावेश होता व त्याचे क्षेत्रफळ १०२.१ चौ. किमी होते. मात्र, ९ एप्रिल १९९७ रोजी काढलेल्या अधिसूचनेद्वारे या अभयारण्यात अंबाबरवा, रोहान्खिडकी व चुनखडी या गावांच्या २२.६२ चौ. किमी महसुली क्षेत्राचा समावेश करण्याचे ठरले. मात्र याची अंतिम अधिसूचना अजूनही निघालेली नाही. त्यानंतर ४ नोव्हेंबर १९९७ रोजी १२.३५ चौ. किमी क्षेत्रावर नरनाळा अभयारण्य अधिसूचित करण्यात आले. यामध्ये गावे नव्हती.

वर्ष १९९७ मध्ये वान अभयारण्य अधिसूचित करण्यात आले. त्यात २०५.८६ चौ. किमी राखीव वन क्षेत्राचा समावेश करण्याबाबत अधिसूचना २९ जुलै रोजी जारी झाली. तत्पूर्वी २८ जुलै रोजी ५.१४ चौ. किमीचे, सात गावांचे गावठाण क्षेत्र समावेश करण्याबाबत घोषणा झाली, मात्र अंतिम अधिसूचना आलेली नाही. त्यानंतर वर्ष २००० मध्ये ८ ऑगस्ट रोजी गुगामल राष्ट्रीय उद्यानाच्या सीमा निश्चित करणारी अंतिम अधिसूचना आणि ६ नोव्हेंबर रोजी मेळघाट अभयारण्याच्या सीमा निश्चित करणारी अंतिम अधिसूचना जारी करण्यात आली. त्यानुसार या दोन्ही संरक्षित क्षेत्रांमध्ये एकही गावाचा समावेश नव्हता.

गुगामल राष्ट्रीय उद्यान व मेळघाट, वान, अंबाबरवा व नरनाळा अभयारण्यांच्या ज्या अंतिम अधिसूचना निघालेल्या नाहीत त्यांचा दाखला देऊन २७ डिसेंबर २००७ रोजी धोकाग्रस्त व्याघ्र अधिवासांची घोषणा करणारी अधिसूचना जारी करण्यात आली. २०१०मध्ये मेळघाटातील सुमारे १०७ गावांचा समावेश धोकाग्रस्त व्याघ्र अधिवासाच्या बफर क्षेत्रात करण्यात आला. त्यातील अंदाजे १८ गावांचे स्थलांतर करण्यात आले आहे. पैकी कोहा, कुंड व बोरी या गावांचे पुनर्वसन वन हक्क कायदा २००६ लागू होण्यापूर्वीच झाले होते.

विरोधाभास या वस्तुस्थितीत आहे की वन्यजीव संरक्षण कायद्यातील धोकाग्रस्त व्याघ्र अधिवासाची तरतूद आणि वन हक्क कायदा या दोन्ही अंतर्गत, स्थानिक समुदायांच्या वन जमिनीवरील वैयक्तिक आणि सामूहिक हक्कांच्या मान्यतेची प्रक्रिया पुनर्वसनापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. गावे, मेळघाटातील महसुली गावांचे क्षेत्र अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान म्हणून अंतिमत: अधिसूचित केले नाही तरीही मेळघाट, वान, अंबाबरवा अभयारण्यांमधील सर्व संरक्षित क्षेत्रांमध्ये बेकायदा पुनर्वसन निर्विवादपणे सुरू आहे. राज्यात वर्ष २००० नंतर घोषित केलेल्या अभयारण्यांच्या अंतिम अधिसूचनांमुळे राखीव वनांमध्ये महसुली गावांची बेटे तयार होत आहेत आणि आत राहणाऱ्या समुदायांचे अधिकार धोक्यात येत आहेत.

- **पुर्णिमा उपाध्याय**

खोज, अमरावती (khojmelghat@gmail.com)

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004